# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| संपादक | : | श्री. अचलकुमार टिल्लू |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | १९९९ |
| वर्ष | : | चौथे |
| अंक | : | ४ |
| पृष्ठे | : | ४० पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या “ग्रंथालय” प्रकल्पांतर्गत निर्मिती**


**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : ३१**

विद्या प्रसारक मंडळाचे
मासिक

# दिशा

वर्ष चौथे / अंक ४/ ऑक्टोबर १९९९



## संपादकीय

### सीमोल्लंघन

अश्विन शुद्ध दशमीला विजयादशमी किंवा दसरा म्हणतात. अश्विन प्रतिपदेपासून नवमीपर्यंत देवीचे नवरात्र असते. याची समाप्ती या दिवशी होते. विश्वकोशातील माहिती प्रमाणे अश्विन शुद्ध दशमीच्या दिवशी आकाशात तारका दिसू लागताच 'विजय' नावाचा मुहूर्त असतो व त्या वेळी जे काम हाती घ्यावे त्यात यश मिळते असे पुराणात सांगितले आहे. हिंदूंच्या साडेतीन विशेष शुभ मुहूर्तातील हा एक आहे. हा विजयोत्सव असल्याने राजांनी आपल्या घोड्यांना सुशोभित अलंकार घालावे. निराजंन नावाचा विधी करावा, शस्त्रास्त्रांचे पूजन करावे व विजयासाठी प्रस्थान करावे. रघुराजाने १४ कोटी सुवर्ण मुद्रा कौत्सास देण्यासाठी कुबेरावर जेव्हां स्वारी केली तेव्हा भीतीने कुबेराने शमीच्या वृक्षावर सोने उधळले त्यांतील काही सोने कौत्सास देऊन बाकीचे नागरिकात वाटले अशी स्कंद पुराणात कथा आहे.

महाराष्ट्रात दसऱ्याला सीमोल्लंघन करुन आपट्याची पूजा करतात व त्याची पाने सोने म्हणून एकमेकांना देतात. पेशवाईच्या काळात मराठे सरदार सीमोल्लंघन करुन नव्या मोहीमेसाठी बाहेर पडत. लवकरच विसावे शतक संपून आपण एकविसाव्या शतकात पदार्पण करणार आहोत. त्यादृष्टीने कोणी कशा तऱ्हेने सीमोल्लंघन करावे हे सांगण्याचा हा एक छोटासा प्रयत्न.

विसाव्या शतकाच्या मध्यावर संगणकाचा शोध लागला व या शतकाच्या शेवटच्या दोन तीन दशकात तर त्याचा उपयोग अनिवार्य ठरला. कारण त्याची माहिती साठविण्याची क्षमता फार मोठी आहे. तसेच मोठमोठ्या आकड्यांचे गुणाकार, बेरजा, वजाबाक्या तो क्षणात व अचूक करतो. त्यामुळेच पृथ्वीपासून जवळ असलेल्या चंद्रासारख्या ग्रहावर माणसास उतरणे या अचूक गणितांमुळे शक्य झाले. नाहीतर ते एक स्वप्नच होते. अशी प्रगती होता होता शेवटच्या दोन शतकात तर माहिती व तंत्रज्ञान यांच्यात जगात मोठमोठे शोध लागून संगणक महाजालाचा (Internet) शोध लागला. व त्याद्वारे माहितीचा प्रचंड सागरच मानवाला गवसला. एकविसाव्या शतकात प्रत्येकाला या माहिती तंत्रज्ञानाचा उपयोग आपल्या जीवनात करावा लागेल.

विद्यार्थ्यांना शाळेत न जाता, घरीच इंटरनेटवर अभ्यास करता येईल. परीक्षा देता येईल. निकाल मिळेल. सर्व काही संगणक, दूरध्वनी या मार्फत होईल. तेव्हा एकविसाव्या शतकात पदार्पण करताना प्रत्येक विद्यार्थ्याने सीमोल्लंघन करुन या माहितीच्या स्रोताला सामोरे जाण्यासाठी सर्व प्रकारची तयारी ठेवली पाहिजे. शाळेत, वर्गात नियमितपणे जाऊन ग्रंथालयांमार्फत प्रत्येक विषयाची अद्ययावत माहिती मिळविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. कारण या माहिती

तंत्रज्ञानाद्वारे इतकी झपाट्याने प्रगती होईल की जो थांबेल तो संपेल. खेळ, संगीत वगैरे सर्व क्षेत्रात उपलब्ध असलेली उपकरणे, साधने वापरून आपला विकास साधला पाहिजे. यासाठी आळस टाळणे आवश्यक आहे.

विद्यार्थ्यांनी एकविसाव्या शतकात जाण्यासाठी तयारी करावयाची म्हणजे शिक्षकाला पण आपले ज्ञान अद्यावत ठेवणे जरूरीचे आहे व त्या दृष्टीने प्रत्येक शिक्षकाने आपण त्यात कमी पडणार याची दक्षता सीमोल्लंघन करताना ठेवावी.

विद्यार्थ्यांच्या पालकांनी सुद्धा आपल्या मुलांच्या संदर्भातील आपली दृष्टी बदलून त्यांच्याशी सुसंवाद साधणे जरूरीचे आहे. बदलत्या  काळाची माहिती करुन घेऊन आपले मूल त्यात कमी पडणार नाही यासाठी प्रयत्न करावेत. पैसा खर्च करावा पण तो छानछोकीसाठी नाही तर पुस्तके, संगणक इ. आवश्यक गोष्टींवर व अभ्यासा व्यतिरिक्त इतर वाचनाची आवड आपल्या मुलाला कशी लागेल याकडे लक्ष द्यावे.

व्यवस्थापनाने सुद्धा नवीन, नवीन अभ्यासक्रम चालू करुन सोयी सुविधा देऊन शाळा/महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना एकविसाव्या शतकात खंबीरपणे नेण्यासाठी सीमोल्लंघन करावे.

प्रत्येक शासकीय किंवा खाजगी उद्योगधंद्यातील कर्मचाऱ्याने एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की एकविसाव्या शतकात मोकळ्या जागतिक व्यापारी धोरणांच्या अनुषंगाने कित्येक परदेशी उद्योग समूह भारतात येतील. काही भारतीय उद्योग समूह त्यात विलीन होतील. अशावेळी जर आपले स्थान टिकवावयाचे असेल किंवा आहे त्या उद्योगधंद्यातच रहावयाचे असेल तर उत्पादन अव्वल दर्जाचे व वाजवी भावाचे हवे. त्यासाठी या स्पर्धायुगात प्रत्येक कर्मचाऱ्याला सीमोल्लंघनाद्वारे आपण करीत असलेले प्रत्येक काम इमाने इतबारे करण्याचे, तसेच ते शंभर टक्के चोख असेल याची काळजी घ्यावी लागेल. तसेच संप, टाळेबंदी या सारख्या मार्गांचा अवलंब करणार नाही, कुठल्याही प्रलोभनाला बळी पडणार नाही अवास्तव पैशाची मागणी करणार नाही अशी खूणगाठ बांधावी लागेल. नाहीतर जागतिक बाजारपेठेत कमी पडून आपली पीछेहाट होईल व देशाला आर्थिक पारतंत्र्यांत दिवस काढावे लागतील.

युवा पिढीने तर सीमोल्लंघन करुन मी वाईट संवयीपासून दूर राहीन अशी शपथ घ्यावी. तसेच परदेशी गेलेल्या तरुणांनी १०-१२ वर्षांनी भारतात परत येण्यासाठी सीमोल्लंघन करावे.

वृद्ध लोकांनी आपल्या मुलांना आपल्याकडे लक्ष देण्यास वेळ नसेल तर वृद्धाश्रमांत रहाण्याची तयारी करावी. सुनेला, जावयाला, मुलगा मुलगी मानावे. माफक व्यायाम करुन निरोगी रहाण्याचा संकल्प करावा.


राजकारणी लोकांनी आपल्या पक्षातर्फे माहिती व तंत्रज्ञानाचे  जाळे आंध्रच्या मुख्यमंत्र्यासारखे आपल्या प्रांतांत करावे व अगदी खेडोपाड्यात त्याचा वापर कसा होईल ते बघावे. देशाच्या सीमा सुरक्षित रहाण्यासाठी सैन्याचे व नागरिकांचे मनोबल वाढवावे.

सैन्यातील अधिकाऱ्यांनी सीमोल्लंघन  करुन देशाच्या सीमा सुरक्षित ठेवाव्यात. आधुनिक शस्त्रास्त्रे पुरविण्याचा आग्रह धरावा.

दुकानदारानी स्वत:कडील मालाची वितरण व्यवस्था संगणकामार्फत चोख ठेवून, उगीचच साठेबाजी करुन वा जास्त नफा मिळवणार नाही असा संकल्प करावा. अशा तऱ्हेने या देशातील आबालवृद्ध, युवा, प्रौढ अशा प्रत्येकाने एकविसाव्या शतकात जाण्यासाठी तन मन धनाने सीमोल्लंघन करण्याची व समोर येणाऱ्या शतकाकडे डोळसपणे बघण्याची नितांत गरज आहे.

थोडक्यात एकविसाव्या शतकातील सीमोल्लंघन म्हणजे प्रत्येकाने आपल्या ज्ञानाची कक्षा वाढविण्याचा मनापासून प्रयत्न करणे, आपल्याशी संबधित असलेल्या सर्व क्षेत्रांतील आधुनिकीकरणाची माहिती करुन घेणे व त्यादृष्टीने आपण करीत असलेल्या कामात आधुनिकीकरण आणण्याचा प्रयत्न करणे.

अचलकुमार टिल्लू
*संपादक*



विद्या प्रसारक मंडळाचे
मासिक

# दिशा

वर्ष चौथे / अंक ४ / ऑक्टोबर १९९९

**संपादक**
श्री. अचलकुमार टिल्लू

**कार्यकारी संपादक**
प्रा. मोहन पाठक

**सहसंपादक**
सौ. मंजिरी दांडेकर

**सहाय्यक मंडळ**
प्रा. संतोष राणे
श्री. संजय बोरकर
सौ. मनाली देवधर
सौ. विशाखा देशपांडे
सौ. भारती जोशी
कु. दीपाली भाटकर
कु. सुंगधा चव्हाण

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. वेडेकर विद्यामंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२.

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस,
ठाणे - ४०० ६०१.
दूरध्वनी : ५३४ १२ ९१

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | श्री. अचलकुमार टिल्लू | मुखपृष्ठ |
| २) | विकृतीकडे झुकलेली जाहिरात | व्ही. सित्ररकर | ३ |
| ३) | पर्यावरण : तुमच्या माझ्यासाठी : २ | डॉ. अरुण जोशी | १० |
| ४) | शांताराम राऊतांचे वेगळपण | सौ. मंजिरी दांडेकर | १३ |
| ५) | नेटवर्क वापरा, तात्काळ माहिती मिळवा ! | श्री. प्रविण वि. प्रधान | १८ |
| ६) | मन | सौ. अचला महाजन | २४ |
| ७) | भांडण | कु. सुगंधा चव्हाण | २७ |
| ८) | सोव्हिएत रशियाचा साक्षेपी इतिहास | प्रा. मोहन पाठक | २९ |
| ९) | चुकते कुठे ? | सौ. सविता केळकर | ३० |
| ९) | परिसर वार्ता | सौ. विशाखा देशपांडे | ३२ |

सुविचार संकलन कु. मंजुषा वालिंबे (बांदोडकर विज्ञान महाविद्यालय) हिने केले आहे.

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी विद्याप्रसारक मंडळ तसेच संपादक सहमत असतीलच असे नाही.

# विकृतीकडे झुकलेली जाहिरात

लेखक, चित्रकार-व्ही . सिन्नरकर

*माध्यमांमुळे जाहिरातींना आलेले अवाजवी महत्त्व आपण रोजच अनुभवतो. या जाहिरात कले विषयी चित्रकाराच्या व नागरिकांच्या दृष्टीने केलेला हा विचार - संपादक*

एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभी जी वृत्तपत्रे होती त्यातूनच कंपोज मजकुरांच्या थोड्याफार नाटकांच्या वगैरे जाहिराती येत असत. हातगाडीवरून, कर्णा लावून अगर दवंडी पिटूनही प्रारंभी अशी जाहिरात थोडी फार शहरी भागात होत असे. इंग्रजी राज्यकर्त्यांनी भारतात ज्या लोकोपयोगी सुधारण्या केल्या पोस्ट, तार, रेल्वे, रस्ते, धरणे अशाच प्रकारे ही जाहिरात कलाही त्यांनीच भारतात आणली.

**प्रारंभीची स्थिती :**

गेल्या ६० वर्षांतील भारतीय कलेच्या प्रगतीचा, जुन्या नव्यांचा हा त्रोटक आढावा या लेखात घेतला आहे. सांगायचे, दाखवायचेही खूपच आहे. जागे आभावी इथेच आवरते घेत आहे. साधारणपणे माझ्या लेखाचे ३ भाग पडतात.

१९३६ ते १९५६ - प्रारंभीच्या समाज प्रबोधन करण्याच्या जाहिराती.

१९५७ ते १९८७ - तंत्रदृष्ट्या प्रगती झालेल्या जाहिराती.

१९८८ ते १९९१ -हा काळ विकृतीकडे झुकल्याचे दिसून येते.

इंग्रजी तेल कंपन्या भारतात तेलाच्या व्यापारासाठी प्रारंभी आल्या. त्यांनी इंग्रजी पद्धतीप्रमाणे भारतातही भारतीय जीवनाचा नीट अभ्यास करून येथे जाहिरात सुरु केली. लोकशिक्षण, लोकांची दैनंदिन गरज अशा या जाहिराती असत. बर्माशेल कंपनीने भारतात प्रथम ही जाहिरात कला व्यवस्थितपणे सुरु केली. इंग्रजी राजवटीमुळे व्हिक्टोरीया राणीचे राज्य होते, भारत शेतीप्रधान देश. बैलगाडी सर्वत्र वापरात, तसाच राणीछाप बंदा रुपयाही रोजच्या वापरात. अशा या दोन्ही गोष्टी लोकांच्या परिचयाच्या. त्यांचा जाहिरातीसाठी बर्माशेलने उत्तम संयोग जुळवून आणला. पत्र्याच्या रॉकेलच्या डब्यावर बैलगाडीच्या चाकाचा ट्रेडमार्क उठावदारपणे केला. तसेच राणीच्या चित्रांचा उपयोग डब्यावर ट्रेडमार्कसाठी केला त्यामुळे अगदी खेडोपाडी लोक दुकानात जावून चक्र छाप, राणी छाप रॉकेलची मागणी करीत. तेव्हा मजकूर फार न देता ही बोलकी जाहिरात भारतात झटकन लोकप्रिय ठरली. तरीही फारशी वृत्तपत्रे इथे नव्हती. ''टाइम्स ऑफ इंडिया'' हेच एकमेव इंग्रजी वृत्तपत्र. थोड्याफार जाहिराती करी त्याही परदेशी कंपन्याच्याच मालाच्या असत. आणि टाइम्सचा वाचकवर्गही मर्यादित होता. उगीच कुणाची तशी जाहिरात करणे प्रशस्त पण नसे. व्यापारी देशी कंपन्या पण कमी होत्या.

वृत्तपत्रे वाढली. वाचनाचा प्रकार वाढला. तसतशी ही जाहिरात कलाही भारतीय जीवनात येऊ लागली. प्रारंभी ॲडव्हरटायझिंग कंपन्या भारतात सुरु झाल्या. जे वॉल्टर थॉमसन, डी.जे.किमर, हिंदुस्तान लीव्हर, मेटल बॉक्स अशा कंपन्याची टाइम्समध्ये जाहिरात होई. ट्रेडमार्क, (बोधचिन्हे ) पण परिचित नव्हती. नावानेच जाहिरात होई.

निसर्ग खोटे बोललेले सहन करीत नाही.

गोदरेज, टाटा, किर्लोस्कर, खटाव, साठे अशा प्रकारची. हीच त्यांची बोधचिन्हे बनली. नाव हाच ट्रेडमार्क.

**शेल कंपनीच्या बोधचिन्हाची सुरुवात -** या बर्माशेल कंपनीच्या कामाचा भारतात लोकशिक्षण, चांगले काम याची निवड करण्याची पद्धती, व्यापार कसा वाढवावा याचे उत्तम तंत्र. अशा या बर्माशेल (शेल म्हणजे समुद्रातला शिंपला) या बोधचिन्हाचा किस्सा हा असा - या तेल कंपन्यांची जगभर मोठी ऑफिसे होती. पेट्रोल पंप, रॉकेलचा व्यापार होता. परंतु प्रारंभी ही नुसतीच तेल कंपनी होती. लोकानाही कंपनी माहिती होती.

एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभी लंडनमध्ये राहणाऱ्या यांचा एक प्रतिनिधी, त्याची लहान मुले समुद्रावर खेळायला जात. जाताना टिफिनचा डबाही नेत. खेळता खेळता या मुलांनी समुद्राच्या वाळूत मिळालेले मोठे शिंपले जमवून त्याची या डब्यावर सजावट केली. घरी येऊन त्यांनी ही लंच बॉक्स वडिलांना दाखविली. वडिलांना मुलांची ही कल्पकता पाहता पाहता एक सुंदर कल्पना त्यांच्या डोक्यात तरळून गेली. त्यांनी तेलाच्या डब्यावर व पेट्रोलपंपावर सर्वत्र या शिंपल्याचे बोधचिन्ह तयार करुन जगभर वापरण्यास प्रारंभ केला. व मग ही शेल कंपनी या नावाने जगभर लोकप्रिय ठरली. भारतात ती बर्माशेल कंपनी या नावाने ती व्यापार करी. अशी ही प्रारंभीची कल्पक तेलाची जाहिरात भारतीय जीवनातही खूप लोकप्रिय ठरली. १८९७ सालात सुरु केलेले हे बोधचिन्ह (ट्रेडमार्क) उत्कृष्ट जाहिरातीचा नमुना आहे. जाहिरातीचे व लोक जीवनाचे किती जवळचे संबंध असतात याची ही उदाहरणे.

**जाहिरात कलेचा परिचय :**

या बर्माशेल कंपनीतर्फे व इतर कलकत्याच्या कांही भारतीय कंपन्यांच्या सहकार्याने १९४७ साली एक खास भारतीय कला, जाहिरात कला, उत्पादनांची सांगड व या दृष्टीने जागतिक जाहिरात कलेचीही ओळख व्हावी या हेतूने "ART IN INDUSTRY" या नावाचे इंग्रजी मासिक भारतात प्रथम सुरु केले गेले. या मासिकानेही व इतर जाहिरात कंपन्यांनी भारतीय जाहिरातीचे स्वरुप हळूहळू छान बदलत नेलेले दिसून येते.

**भारतात जाहिरातकलेच्या रीतसर शिक्षणास प्रारंभ**

जमशेटजी जिजीभाय यांनी इंग्रजांच्या मार्गदर्शनाखाली मुंबईचे सर जे.जे. स्कूल ऑफ आर्ट १८५४ सालीच मुंबईत सुरु केले होते. प्रारंभी ड्रॉईंगपेंटिंग, स्कल्पचर वर्कशॉप असे विभाग यात होते. परंतु १९३४ साली इंग्रजांनी सर चार्लस्, जेरार्ड या कलेची उत्तम जाण असलेल्या युरोपियन चित्रकाराची स्कूल ऑफ आर्टचे डेप्युटी डायरेक्टर म्हणून नियुक्ति केली. सर जेरार्ड स्वतः भारतीय जीवनाचे गाढे अभ्यासक तर होतेच. त्यांनी इंग्रजीत काही पुस्तकेही लिहिली होती. त्यांनीच मग ड्रॉईंगपेंटिंग शिकणाऱ्यांना व्यापार, जाहिरात कलेचीही माहिती करुन द्यावी या उद्देशाने सरकारच्या मदतीने १९३५-३६ साली कमर्शिअल आर्ट हा स्वतंत्र अभ्यासाचा विभागच सुरु केला. प्रारंभी या विभागाचे प्रिन्सिपॉल म्हणून V.N.उर्फ दादा आडारकरांची नियुक्ति केली गेली. या नव्याने सुरु केलेल्या कमर्शिअल आर्ट विभागात जाहिरात तंत्राचा सांगोपांग अभ्यास करुन घेतला जाई. त्यावेळी फोटोग्राफी, लिथोग्राफी, इंटिरिअर डेकोरेशन असे खास विषय डिप्लोमासाठी ठेवलेले असत.

भारतीय जाहिरात कलेची जगभर लोकप्रियता वाढली त्याचे कारण या कमर्शिअल आर्ट (उपयोजित कला) विभागातून शिकून तयार झालेले उत्तम चित्रकार, तंत्रज्ञान, उत्तम कारागीर आहे.

प्रारंभी जिमखाना व गोडाऊनच्या शेडमध्ये हे स्कूल सुरु झाले. नंतर सिडनहॅम कॉलेजची संपूर्ण इमारतच या उपयोजित कला विभागाला आडारकरांनी मिळवून तिचे भव्य असे स्वरुप केले. आज जाहिरातीस लागणाऱ्या सर्व

---

निसर्गामध्ये कधीही बक्षिसे मिळत नाहीत किंवा शिक्षाही नसतात. तेथे फक्त कृतींचे परिणाम दिसून येतात.

तांत्रिक व चित्रकलेचे सर्व शिक्षण या एका ठिकाणी घेता येते. आणि अशा प्रकारे भारतात कमर्शिअल आर्ट, व नव्या जाहिरात कलेचे उच्च शिक्षण सुरु झालेले दिसते. गेल्या साठ वर्षातील जुन्या जाहिरातींचे इथे व्यवस्थित चित्र वाचकापुढे ठेवणे फार मोठे काम. या साठी मला ३-४ मोठे वेगळे लेखही लिहावे लागतील म्हणून मर्यादित जागेत जेवढे जुने, नवे स्वरुप इथे वाचकांसमोर ठेवणे शक्य तेवढे मी करीत आहे. माहिती संपूर्ण सचित्र देणे अवघड काम नसले तरी वृत्तपत्रांच्या, मासिकाच्या पानाच्या मर्यादेतच हे करावे लागते. उणिवा राहून गेल्यास वाचकांनी त्या समजून घ्याव्यात ही अपेक्षा.

भारतभर देशी, परदेशी जाहिरात कंपन्यांचे प्रचंड जाळेच तयार झालेले आहे. एकट्या मुंबईतच नामवंत अॅडव्हरटाइझींग कंपन्यांचे प्रचंड जाळे पसरलेले आहे. देशी उत्पादकाप्रमाणेच परदेशी कंपन्यांची उत्पादने इथे प्रचंड वेगाने लोकप्रिय होत आहेत. याचे कारण अतिशय तंत्रशुद्ध भारतीय जीवनाशी सुसंस्कृतपणाने एकरुप झालेली ही जाहिरात लोकशिक्षणाच्या प्रगतीचे, धंद्यातील व्यापारी प्रगतीचे प्रचंड खपाचे साधन ठरली आहे. साबण, पेये, कपडे, साड्या, यंत्रे, वृत्तपत्रे, कॉम्प्युटर्स इत्यादींची जी जाहिरात इथे होते ती मालाची बाजारपेठ मोठ्या प्रमाणावर काबीज करते. उदा. मॅगी कंपनीचे नूडल्स प्रारंभी बाजारात आले त्यावेळी सुंदर जाहिरात पहा '' मम्मी भूख लगी है । सिर्फ दो मिनट ।'' हे आईमुलांचे संवाद. एकाच जाहिरातीने भारतात नूडल्स घरोघरी पोचले. या यंत्राने केलेल्या शेवया होत्या. परंतु प्रचंड आकर्षक जाहिरात. व त्यासाठी जी Slogan हेडलाइन, डायलॉग लेखन लागते त्याला लाखो रुपये व कल्पकता लागते. दुसरे उदाहरण साबणाच्या जाहिरातीचे. घरातील कपड्यांना पडलेले डाग या साबणाने झटकन जातात. मग गृहिणी म्हणते, '' दाग ? ढुंडते रहजाओगे । ही बोलकी उदा. घरच्या गरजेतून उत्तम जाहिरात, मदतही करतात. किंवा सिगारेटची तरुणतरुणींची मॉडेल वापरुन केलेली जाहिरात. Made for each other ''एक दूजे के लिए'' अशी अनेक उत्तम जाहिरात प्रारंभी सर्वत्र होत असे. या सर्वत्र निर्माण झालेल्या अॅडव्हरटाइझींग सर्व्हिसेस भारतात सर्व शहरातून भरभराटीस आल्या. प्रारंभी भारतीय कंपन्या दत्ताराम कं., नॅशनल अॅडव्हरटाइझींग, एव्हरेस्ट, टॉम अॅण्ड बे, प्रतिभा, हिरो, रतन बात्रा, पद्मजा, स्वामी, शिल्पी इत्यादि भारतीय मंडळींनी सुरु केलेल्या नामवंत जाहिराती कंपन्या. त्यावेळी सिगारेट, दारु इत्यादी व्यसनयुक्त जाहिराती या भारतातल्या कंपन्या करीत नसत. उत्तम सुसंस्कृतपणे जाहिरातीत लोकजागृती, उत्तम मालाची निवड कशी करावी यांचे शिक्षणही या कंपन्यांच्या जाहिरातीमधून होत असे.

उत्तम जाहिरातीचे उदाहरण म्हणजे पार्ले कंपनीची संपूर्ण जाहिरात. ही एव्हरेस्ट अॅडव्हरटाइझींग कं. करीत असे. पार्लेच्या कॅलेंडरवर S.M. पंडितांनी रेखाटलेले रामसीतेचे वनवासातील अप्रतिम पेंटिंग त्यावर वापरले होते. हे कॅलेंडर प्रारंभी ४-५ हजार प्रतीपर्यंत असते. हे रामाचे कॅलेंडर लोक विकत घेत असत. व मग पांच सहा लाखावर ते छापावे लागले. जाहिरातीच्या क्षेत्रात या कॅलेंडरने इतिहास घडविला. याच काळात S.M. पंडित, दलाल, लँगहॅमर, माळी, गोडसे,बापुलकर, मुळगांवकर, व्ही. मित्रकर, शि.द. फडणीस, राव, रतन बात्रा असे अनेक चित्रकार जाहिराती क्षेत्रातून नावा रुपाला आलेले आहेत.

**जाहिरात व्यवसायातील काही महत्त्वाच्या संस्था :**

- अॅडव्हरटाइझींग एजन्सीज असो. ऑफ इंडिया - १९४५
- अॅडव्हरटाइझींग क्लब - १९५४
- कमर्शिअल आर्टिस्ट गील्ड - [C.A.G.] - १९४८
- दि इंडियन सोसायटी ऑफ अॅडव्हरटायाझर्स लि.

---

- १९५२

रेडिओ ॲडव्हरटाइझींग ॲंड प्रॉडक्टस् असो. ऑफ इंडिया-१९७९

रेल्वे ॲडव्हरटाइझींग एजंटस् असो. ऑफ इंडिया - १९७९

इंडस्ट्रियल डिझाइन् अशा संस्थाचे या जाहिरात व्यवसायाचे उत्तम प्रगतीशील परिवर्तन करण्यात फार मोठा प्रारंभी हातभार आहे. CAG सारख्या संस्थेने तर वर्षभरातील उत्तम आहिरातींच्या चित्रांचे सर्व प्रकारच्या जाहिरातींचे प्रदर्शन जहांगीर आर्ट गॅलरीत सुरु केले व उत्तम जाहिरातींना फार मोठी बक्षिसे देवून गौरव केला. एजन्सींनाही बक्षिसे दिली जातात. अशा प्रकारे जाहिरातींची १९३६ ते १९५६ पर्यंत ही प्रगतीची वाटचाल या सर्व कालखंडात प्रसिद्ध झालेल्या सुंदर जाहिरातींची चित्रे जागे अभावी देणे शक्य होणार नाही. वाचकांनीही हा जाहिराती पाहिलेल्या आहेत. CAG ने अंकही याची बोलकी साक्ष आहे. वाचकांनी कमर्शिअल आर्ट शिकणाऱ्यांनी हे CAG वार्षिक अंक जरूर विकत घेऊन त्याचा अभ्यास करावा. मी देखील याच सर जे.जे. स्कूल ऑफ आर्टचा विद्यार्थी. १९५०-५१ साली मी ड्रॉईंगपेंटिंगचा अभ्यास करीत असतानाच कमर्शिअल आर्टचा प्रथम श्रेणीत डिप्लोमा घेतला. CAG ची बक्षिसेही मिळविली. त्यावेळचे सहकारी मित्रातील रमेश संझगिरी नंतर ''टाईम्स ऑफ इंडियात'' आर्ट डायरेक्टर झाले.

गेली ४५ वर्षे निरनिराळ्या जाहिरात एजन्सिजमधून कामे करताना जाहिरातीच्या बदलत्या परिवर्तनात मीही सहभागी होत गेलो. वृत्तपत्रे, मासिके, साप्ताहिके गावोगावी वाढत गेली. कारखाने, उत्पादने वाढली. अनेक कारखाने खाद्यपेये, वस्त्रप्रावरणे, अलंकार, यंत्रे, घरे, प्रवास सारेसारे गरजेचे वाटत गेले. उत्पादकांत स्पर्धा सुरु झाल्या. मग जाहिरात कलेला भरभराटीचे दिवस येत गेले. जाहिरातींची माध्यमे वाढली. तंत्रे, प्रसारीकरण, वृत्तपत्रे व पेंटिंग, दूरदर्शन, रेडिओ, थिएटर स्लाइडस, विंडो डिस्प्ले, पोस्टर्स, किओस्क, होर्डिंग्ज इत्यादीतून होणारी रोज २४ तासांची भारतीय जाहिरात आज भारतीय जीवनाचा एक खास गरजेचा घटक बनून गेली. आपण जाहिरात वाचून निवड करु लागलो. लोकशिक्षण वाढले. रसिकता, गरजा वाढू लागल्या. पैसाही मुबलक रास्त व तसाच अवैध मार्गांनी लोक भरपूर जमा करायला लागलेत. मग व्यापारी कंपन्याही नव्या युक्त्या, प्रयुक्त्या वापरुन लोकांना मूर्ख बनविण्यात पटाईत झाल्या. Fooling the Masses. असेही एक जाहिरात तंत्र असते. सिनेमाचे कथानक त्याची चित्रिकरणाची पद्धत सामान्य प्रेक्षकांना स्वप्नाळू बनविते. जे त्याला प्रत्यक्ष जीवनात मिळत नसते ते सिनेमा पाहतांना तो स्वप्नाळू वृत्तीने अनुभवित राहतो. कारण आजचा चित्रपट फारच विकृतीने भरलेला. मग जाहिरातीतही विकृती येत गेली. सिनेमातला हिरो कधीच शिकत नसतो. कधी नोकरी करीत नाही. मारामाऱ्या, लूटमार, कुणाही अनोळखी तरुणीस कुठेही ओढाताण करुन, धांगडधिंगा करुन प्रेमात पाडतो, आणि गात असतो. तीही तरुणी घरदार नसल्याप्रमाणे या उनाड पोराबरोबर रानोवनी गाणी गात नाचत व अश्लील, चाळे, चुंबने, आलिंगने देत आणि या प्रेमात त्यांना साथीला मागे ५० -१०० अर्धनग्न पोरींचा तांडा, विदुषकी ड्रेसची पोरे व बँडच्या तालावर त्यांची कवायत. हा म्हणे भारतीय नृत्यकलेचा नमुना ! जुने चित्रपट पहा, त्यातही शृंगार होते पण अभिनयाला महत्व होते. आता नग्न होणे, नग्न शरीर प्रदर्शन करणे ही लोकांना क्षणभर संस्कृती विसरायला लावणारी कला. गुन्हेगारी वाढते याचे कारण हे जाहिरातीनी भरलेले विकृत सिनेमे.

दूरदर्शनवरील भंकस सिरियल्स, बुटांची, सेंटची, कंडोम्सची, अंतर्वस्त्रांची किळसवाणी जाहिरात यामुळे तरुण पिढीवर, लहान मुले यांच्या मनावर काय वाईट परिणाम या विकृत जाहिराती करुन जातात याचा हल्लीचे

---

प्रत्येक काटेरी झुडपातून शहाणपण लाभते; प्रत्येक झरा गोड असा धडा आपल्या शिकवतो.

पान्कंही विचार करीत नाहीत. केवल टी.व्ही. मुळेही वरील ओंगळ प्रकार लोक पाहतांना दिसतात. शीतपेयापासून क्रिकेटच्या खेळापर्यंत सर्व गोष्टी या प्रचंड श्रीमंत उत्पादकांनी, विक्रेते अशांनी जाहिरातीसाठी कोट्यावधी डॉलर्स खर्चून जगभर लोकांना जाळ्यात ओढून नको ती पेये, सिगारेटस्‌चे व्यसन लावलेले आहे. जगात क्रिकेट शिवाय दुसरा खेळच नसल्याप्रमाणे भारत सरकारही निव्वळ स्पॉन्सरर्स मिळतात भरपूर पैसेही मिळतात म्हणून सरकारी यंत्रणाच या कंपन्यांना भाड्याने कायमची देतांना दिसते. पूर्वी जाहिरातीसाठी सर्व चित्रे (इलेस्ट्रेशन) हाताने नामवंत चित्रकार रेखीत. उदा. टाईम्सचे आर्ट डायरेक्टर वाल्टर लँगहॅमर यांचे देता येईल. त्यांनी जाहिरातीसाठी रेखाटलेली सर्व चित्रे पेंटिंग्ज भारतीय जीवनाचे उत्तम दर्शन करणारी होतीच परंतु पेस्टल वर्क, क्रेपरबोर्ड, ब्रशवर्क रंगीत ऑईलपेंटिंग, जलरंगाची चित्रे याचा त्यांनी चित्रात जाहिरात कलेत केलेला उपयोग त्यावेळचे भारतीय चित्रकार एक आदर्श मानीत.

नंतर मात्र चित्रपट तारकांचा मॉडेल म्हणून उपयोग करुन जाहिरात होत गेली. मग अनेक सौंदर्य स्पर्धा उदयाला आल्या. भारत सुंदरी, जगत सुंदरी आल्या. शरीरप्रदर्शन करण्याची स्पर्धा सुरु झाली. भरपूर पैसे थोड्या वेळात मिळू लागल्याने अनेक ठिकाणच्या मुली मॉडेलींग व्यवसायात आल्या. मग आंबटशौकीनांना, शृंगारप्रेमी वाचकांना भुलवण्यासाठी सर्व प्रकारच्या जाहिरातीतून या नग्नतेचे नको तेवढे प्रदर्शन आजची जाहिरात करते आहे. वास्तविक बिस्किटांचा, बुटांचा, सुंदर कपड्यांचा, शीतपेयांचा या बायकांशी काय संबंध ? यालाच स्टंट जाहिरात म्हणतात. नाहीतर एका पेयाच्या बाटलीसाठी लाखो डॉलर्स मिळतात म्हणून जाहिरातीत भांडणारे तेंडुलकर, कांबळी, अझरुद्दीन क्रिकेटर्स, एका पोरीला पेयाची बाटली देण्यासाठी रस्त्यातून वाटेल तशा मोटारीवरुन माकडासारख्या उड्या मारणारा अमीरखान (हिरो), पेप्सीकोलाची हवेतील बाटली पकडण्यासाठी अर्धी ढगळ चड्डी घालून उड्या मारणारा आमचा क्रिकेटचा माजी कप्तान अझरुद्दीन. अशा या विकृत जाहिरातींचा बालमनावर किती परिणाम होतो याची उदाहणे पहा -

क्रिकेटबद्दल अगदी लहान मुलानाही आज आकर्षण, वेड आहे. आणि ज्या वेळी नामवंत क्रिकेटवीर जेव्हा पेप्सीकोलाची बाटली हवेत ऊंच उडी मारुन पकडतो त्यासाठी त्याला लाखो रु. मिळतात. पण लहान मुलगा फ्रिजमध्ये ठेवलेली थंड पेयाची बाटली काढून घेवून पलंगावरुन ती हवेत टाकून पकडण्याच्या प्रयत्न करतो- पडतो-बाटलीच्या काचा लागतात, हाताचे हाड मोडते, घरच्यांचा ओरडा मिळतो. निव्वळ फसवी जाहिरात व त्यामुळे बालमनावर झालेला एक परिणाम.

हे कुठे तरी थांबायलाच हवे. महाराष्ट्र सरकार, भारत सरकार त्यांचे सांस्कृतिक मंत्री, सेन्सारबोर्ड, महिला समाज यांनी याबाबत आजच कांही निर्बंध घालायला हवेत. कोणतीही जाहिरात, चित्रपट कुणीही काढतो, छापतो, दर्शनीय करतो. वचक कुणाचाही नाही. सांस्कृतिक मंत्रालये, मंत्री नटींच्या सहवासात जवळून आनंद मिळतो म्हणून कोणत्याही समारंभाला प्रथम हजर राहतात. नट्यांनाही तेच हवे असते. त्यांचे चित्रपट पास होतात. जाहिरातीत नागडे उघडे नाचून खूप पैसे मिळविता येतात. मंत्र्यांना थोडे दिले की काम फत्ते. आणि आता तर भारतीय बाजारपेठेवर अतिक्रमणच केले आहे परदेशी कंपनीच सरकारला डॉलर्स मिळतात या सबबीवर त्यांची कसलीही जाहिरात इथे आणली जाते. परदेशी कंपन्यांचे हे आक्रमण हळुहळू भारतीय जाहिरात केवळ संस्कृतिघातक ठरणारे आहे. स्त्रीमुक्तीची चळवळ करणाऱ्या भगिनी, संस्कृतिची गप्पा करणारे नेते, लेखक, राजकीय मंत्री ह्यांनाच हे सारे मनातून हवे असेल. आजही ही अर्धनग्न वाटेल तशी केलेली, स्त्रीयांच्या देहाचे वाटेल तेवढे नग्न प्रदर्शन घडविणारी जाहिरात, चित्रपट, सिनेमाची व इतर मासिके,

---

एखादेवेळी कलेमध्ये चुका होऊ शकतात पण निसर्ग चुका करत नाही.

वृत्तपत्रे याचा सर्वत्र सुकाळ आहे. याचे कारण नको तेवढी भरपूर जाहिरात या माध्यमांना आज मिळते. खेडोपाडीची वृत्तपत्रे यामुळे निघालीत. लोकजागृतीचे सर्व बंध तोडून जाहिरात कंपन्यानी दिलेली कसलीही जाहिरात यात छापून येते. लोकही मुर्दाड, निर्ढावलेले आहेत. आज ब्लॉकपद्धतीमुळे कुटुंबातील लहानांचे, मोठयांचे व्यवहार एकत्र होवून गेलेत. मग अगदी लहान मुलेही वाटेल ती गाणी गातात, वाटेल त्या जाहिराती वाचतात, पहातात. वृत्तपत्रापेक्षाही भारतीय दूरदर्शनवरुन होणारे हे प्रेक्षकांचे अधःपतन असेच होत राहील. तरुण मुलेमुली नको ते लैंगिक चाळे करुन ऐन तरुण वयात विकृतीमुळे रोगी बनतील. 'एडस्' ची लागणही याच जाहिरातीमधून नको तेवढ्या स्त्रीपुरुष संबंधातील जाहिरातीमुळे होत आहे. गुन्हेगार मुले, पळून जाणाऱ्या मुली, मॉडेलींग, चित्रपट, नाटक यात सहज प्रवेश होतो म्हणून सुंदर तरुण मुलींना या क्षेत्रात तिच्या अंगी अभिनय असो नसो ती सुंदर दिसते, तिच्यात सेक्स अपील भरपूर, मग पैसाही भरपूर मिळेल. अशा स्वप्नात रंगून भलत्या फसव्या जाहिरातीना बळी पडणारे पालक.

जाहिरात माध्यम उत्तम आहे. जगभर ते उपयोगी आहे. उत्तम ग्राहक, उत्तम उत्पादक, उत्तम जाहिरात असे सारे घटक एकत्र झालेले आहेत.एका बाजूस जुन्या काळी आम्ही चित्रकार, जुन्या जाहिरात कंपन्या करीत असलेली सुंदर जाहिरात आणि व्यापारी स्पर्धेत वाटेल तसा पैसा ओतून नको तशी विकृतीने भरलेली जाहिरात करावला लावणारे उत्पादक, श्रीमंतांच्या हव्यासापोटी वाटेल ती जाहिरात करुन देणाऱ्या एजन्सिज, वृत्तपत्रे मासिके यात येणारे नट्यांचे फोटो त्यांना चित्रपटातील भूमिकेपेक्षा श्रीमंत रसिक शेजेला जवळ घेणारे रसिक हवे असतात. म्हणून ही जाहिरात स्वतःच्या पैशानेही या नट्या, त्यांचे दलाल देतात. कॉलमपेड पब्लीसिटी ही सिनेमा व्यवसायातून जन्माला आली. त्यामुळे आज शेकडो फिल्मी मासिके सिनेमा जाहिराती-नट्यांचे हव्या त्या पोझेसमधील सुंदर-फोटो यांचे समाजातील आकर्षण वाढले. आणि सर्वात शरमेची गोष्ट म्हणजे आमच्या मराठी मुलींनी नट्यांनीच फोटो दरवेळी देवून पैसा व प्रसिद्धी मिळविली हा ही एक जाहिरातीत स्टंट भाग ठरतो.

अर्थात आज मुंबईत अनेक उत्तम मॉडेल, फोटोग्राफर आहेत. उत्तम मॉडेल्स उपलब्ध आहेत. सर्वच वाईट नाही. परंतु जो चांगला भाग तो मागे पडतो नको ती विकृत जाहिरात समोर येते. वास्तविक अलिकडे १५-२० वर्षाच्या नट्यांचा, सुंदर तरुणींना मॉडेलींग करण्याची भरपूर संधी. नाटकातून काम करतांना, मॉडेलींग करीत, चित्रपटातूनही कामे मिळवून लोकप्रिय झालेल्या मुलींची अनेक उत्तम उदाहरणे आहेत.

जाहिरातींच्या आजच्या तांत्रिक स्वरुपाची झलक सर्व वृत्तपत्रवाचक रोज घेतातच. जुने व नवे अशी दोन पर्वे यात खर्च पडली. माझ्या पिढीतले वयाने ५० पुढचे वाचक व २० ते ५० वर्षाचे आजचे वाचक यांना नव्या जाहिरातींचा येणारा अनुभव खूपच चांगला आहे. या छोट्याशा लेखात प्रारंभीचे स्वरुप प्रगति व आजचे विकृतीकडे झुकणारे जाहिरात तंत्र, त्यामुळे समाजप्रबोधन न होता समाज विघटन, विकृतीयुक्त समाज, एड्स, दारु, सिगारेटच्या व्यसनांत बुडालेला तरुण समान यासाठी जाहिरात माध्यम किती प्रभावी काम करु शकते याची थोडी ओळख रोजच विविध जाहिराती पहाणाऱ्या वाचकांना करुन द्यावी. पालकाना थोडी वेळीच जाण करुन द्यावी. हा विषय फार मोठा सचित्र करायचे म्हटले तर वृत्तपत्रांच्या ३-४ पुरवण्या अपुऱ्या पडतील इतके साहित्य जाहिरातींचा संग्रह माझ्या जवळ आहे. तरीही कुणी तरी जाहिरात व्यवसायात ५० वर्षे वावरुनही वेळीच या विषयाला वाचकांनीही वाचा फोडावी. आजची भारतीय जाहिरात कला जागतिक स्पर्धेत वेगाने पुढे जाते आहे. गॅट करारामुळे परदेशी कंपन्या फार

मोठ्या संख्येने भारतात आल्या. त्यांनी नामवंत जाहिरात कंपन्याही इथे बऱ्याच आणल्या आहेत. त्याच्या अ‍ॅडव्हरटाइझिंग एजन्सिजही भारतात सुरु आहेत. जसे हिंदुस्तान लिव्हरचे लिंटास ही परदेशी कंपनीची भारतीय आवृत्ती. आता उत्तम जाहिरात संकल्पना, उत्तम तांत्रिक सुधारणा, उत्तम कॉपी लेखन, उत्तम छपाई, उत्तम चित्रीकरण, उत्तम मॉडेल्स, मॉडेल फोटोग्राफी आज सुंदर आहे. पूर्वी जाहिरात कशी असे. ती एज्यूकेट दी मासेस अशी असे. आता जाहिरात उत्तेजीत करणारी ठरते. आजची जाहिरात कशी आहे. ती एज्यूकेटीव्ह आहे कां ? फसवी आहे कां ? रास्त विचार मांडते का ? कुणी तरी मला विचारले होते. जाहिरात म्हणजे काय ? What is Advertising ? मी उत्तर दिले होते Fifteen percent commission and Eighty five percent confusion ! याच गोंधळलेल्या अवस्थेतून आजची जाहिरात आते आहे. Fooling the Masses असे तिचे स्वरुप होते आहे याचा वाचकांनी विचार करुन काय ते ठरवावे असे वाटते.

प्रत्येक विषय जाहिरातींचा विषय, स्त्रीयांच्या उत्तान सौंदर्याकडे वळविल्याचे दिसून येते. मग ती पानपराग, बिस्किटे, व्हिडिओकॉन, साड्या, दागिने, शीतपेये, सिगरेट, घर, ब्लॉक्स कॅलेंडर, घरात लावायची पेंटिंग्ज सर्वत्र नग्नतेचे प्रभावी जाहिरात चित्रण केलेले दिसते. अजगरांच्या सहीत नग्न ओडपेही मिलिंद सोमण, मधु सप्रे यांच्या जाहिरातीने किती ओंगळपणे जाहिरात होऊ शकते याचे दर्शन घडले. रस्त्यावर जातांना, रेल्वेस्टेशन, चित्रपटगृहे, समारंभाचे हॉल, खांबावरची पोस्टर्स, होर्डिंग्ज, डिस्प्ले सर्वत्र आज ही हवीच का? पण एकदा ताळतंत्र सोडून नको त्या मॉर्डन तंत्राला आजची जाहिरात बळी पडते आहे. उत्तम जाहिराती, उत्तम सिनेमे पूर्वी पण निघाले. त्यातही नायकनायिकांचे शृंगारिक दर्शन छान दर्शविलेले होते. आजचा सिनेमा, जाहिरात, दूरदर्शनवरील जाहिराती कॅसेटमधील नको त्या जाहिराती प्रत्येक खोक्यावर मग तो मिक्सरचा असो शर्टाचा असो सर्वत्र नग्नतेमुळे नको ती विकृती मनात घर करते. आरोग्याच्या दृष्टिनेही तरुण पिढीचे हे मानसिक अधःपतन आजची विकृत जाहिरात कुठवर करीत राहणार सूज्ञ वाचकांनी, दर्शकांनी यावर आपले रास्त मत, चिंतन प्रगट करायला हवे. आज आपण कॉम्प्यूटर अ‍ॅडव्हरटाइझींग पर्यंत पोचलो, कॉम्प्यूटर तंत्रानेही जाहिरात अनेक अंगानी प्रगत झाली. टायपोग्राफी (कॅलीग्राफी) कॉपी रायटींग, जिंगल रायटींग, उत्तम रंगीत छपाई, उत्तम उत्पादने, उत्तम वृत्तपत्रे माध्यमे यामुळ भारतात जाहिरात या जरुरीच्या व्यवसायाचे प्रचंड स्वरुप झालेले आहे. आज जे.जे. स्कूल ऑफ आर्टच्या उपजिवित कलेचे शिक्षण घेवून जी मुले मुली उत्तम प्रकारे उत्तीर्ण होतात त्यांना चांगल्या नोकऱ्यांची पण शाश्वती सर्वत्र आहे. मात्र स्वतंत्र बुद्धी, कल्पकता, प्रचंड परिश्रम करणाऱ्यांनीच या व्यवसायात यावे. गंमत म्हणून येवू नये.

जाहिरात या व्यवसायावद्दल मला पूर्ण प्रेम आहे. तरीही आजची नको तितकी भडक, नको त्या गोष्टींची भारंभार जाहिरात करणारी जाहिरात मला नको आहे. परत चांगल्या गोष्टी इथे याव्यात ही रास्त अपेक्षाही आहेच.

**व्ही. सित्ररकर**
सूर्यकिरण हाऊसिंग सोसायटी,
शिवाजी नगर, नौपाडा, ठाणे २
दूरध्वनी : ५४० ०२२२.

•••

*With Best Wishes from*

✳

**SUDHARMA TUBE CO.**
Mumbai

# पर्यावरण : तुमच्या माझ्यासाठी : २

# प्राचीन भारतीय निसर्गविज्ञान: शिल्प व चित्रकला

डॉ. अरूण श. जोशी

*(पर्यावरणाचा ऱ्हास करण्यास मी कोठे कारणीभूत आहे, असेच प्रत्येकाला वाटत असते, पण हा गैरसमज असतो. पर्यावरणांच्या क्षेत्रात भरीव कार्य केलेले डॉ. जोशी या दृष्टीने आपणास अंतर्मुख होण्यास भाग पाडतील - संपादक)*

आज जाणवणारी पर्यावरण समस्या व तिची कारणे यांची चर्चा मागील लेखात केली होती. आजची ही समस्या 'आज' मुळे निर्माण झाली आहे. मानवी आस्तित्वाच्या गेल्या हजारो वर्षांच्या काळांत काय परिस्थिती होती ? पर्यावरणाशी निगडीत समस्या तेव्हा नव्हत्याच का ? मानवी संस्कृतीच्या अगदी प्राथमिक अवस्थेत पर्यावरण समस्येने बहुधा फार गंभीर रुप धारण केले नसावे असा अंदाज करता येतो. ''....... विपुलाच पृथ्वी'' असल्याने तत्कालिनांना सभोवतीच्या पर्यावरणात अगदी सावकाश होणारे बदल फारसे जाणवले असण्याची शक्यता वाटत नाही. आणि ते जाणवले असले तरी त्यांचा कार्यकारण भाव त्यांच्या लक्षात आला होता किंवा नाही हे नक्की समजत नाही. सांस्कृतिक प्रगतीचा प्रारंभ झाल्यानंतर मात्र माणसाने आपल्या सभोवतीच्या निसर्गाकडे व त्यातील घटितांकडे डोळसपणे बघण्यास सुरुवात केली. याचे पुरावे जगातील प्राचीन संस्कृतीतील लोकांच्या कला, तत्त्वज्ञान व वाङ्मयात बघावयास सापडतात. अति प्राचीन अशा भारतीय संस्कृतीत तर ते विशेषत्वाने आढळतात. पर्यावरण आणि निसर्ग विज्ञानाची जाण आणि प्रगतीची परंपरा मध्ययुगोत्तर काळात भारतात झालेल्या राजकीय स्थित्यंतरामुळे ही खंडीत झाली. पर्यावरण विषयक अभ्यासाची आज आपल्यावर पुनः नव्याने सुरुवात करण्याची पाळी आली आहे. याबाबतचा आपला विचार आज बव्हंशी पाश्चात्य कल्पनांच्या आधारे चालू आहे. प्राचीन भारतीय विचारात काही उपयुक्त गाभा सापडतो का याचा निदान शोध तरी घेण्याचा प्रयत्न कोणी तरी तज्ज्ञ व्यक्तीने करायला हवा. 'मातीशी' इमान राखणाऱ्या विचारांचा अधिक फायदा होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

ऋग्वेदकालीन विचारवंतांनी 'ऋतम्' ची संकल्पना मांडली आहे. 'निसर्गाचा समतोल' असा या संकल्पनेचा थोडक्यात अर्थ सांगता येईल. 'ऋतम्' नाश पावेल असे काही करता कामा नये असे त्यांचे सांगणे होते. सूर्य, नद्या, वृक्ष, पर्वत इत्यादीमुळेच मानवी जीवन सुसह्य व समृद्ध होऊ शकते असा त्यांचा विश्वास होता. आपल्या तत्त्वज्ञानातील 'पंचमहाभूते' ही संकल्पना यातूनच पुढे आली असावी. तत्कालिन जनसामान्यांचे मात्र या अमूर्त संकल्पनांपेक्षा सभोवतालच्या निसर्गात आढळणाऱ्या सजीवांनी अधिक लक्ष वेधून घेतले असावे. याचा प्रत्यय प्राचीन कलानमुन्यांतून येतो. मोर, हंस यांसारखे अनेक पक्षी; हत्ती, हरणे, सर्प यासारखे इतर प्राणी व वृक्ष-वेली याना प्राचीन भारतीयांनी चित्रबद्ध व शिल्पबद्ध करुन ठेवले आहे. त्यावरुन त्यांचे निसर्ग निरीक्षण व ज्ञान याची चांगली कल्पना येते. निसर्गाशी त्यांची असलेली जवळीकही प्रत्ययाला येते. प्राचीन भारतीय कलेचे काही नमुने पाहू.

---

निसर्गात प्रत्येक गोष्टीसाठी वेळ यावी लागते.

हरप्पाकालिन (इ.स.पू. २३५० ते इ.स.पू. १५००) अत्यंविधीत वापरल्या जाणाऱ्या एका रक्षापत्रावर डौलदार मोराचे चित्र काढलेले आहे. मोराच्या पोटात मृतमाणसाची आकृती आहे. मृत्यूनंतर आत्म्याला स्वर्गात नेण्याचे काम मोर करतो अशी त्या लोकांची धारणा होती. मोराचे चित्र जरी वास्तवप्रकारचे नसले तरी त्यात मोराचे दोन शरीर विशेष - डोक्यावरचा तुरा आणि पंख्यासारखी शेपूट - अगदी स्पष्टपणे दाखविलेले आहेत. सैंधवकालिन मुद्रा आणि भांडी यांवरील चित्रांत विविध प्राणी चितारलेले दिसतात. हरिण, हत्ती, गेंडा, वृषभ, सर्प यांचा त्यात समावेश आहे. पिंपळाचे झाड व अन्य वृक्षही त्यात आढळतात. या चित्रांवरील प्राणी परस्परांत किंवा माणसाशी संघर्ष करीत असलेले अभावानेच आढळतात. एकूणच, हरप्पाकालिन भारतात माणूस निसर्गाशी मिळते जुळते घेऊन रहात होता असेच म्हणावे लागते. मात्र ही स्थिती उत्तर हरप्पाकाळात झपाट्याने बदललेली दिसते. या काळात तेथील भूगर्भातील उलथापालथींचे प्रमाण वाढले. पर्यावरणाच्या ऱ्हासामुळे हडप्पा संस्कृतीचा नाश झाला असेच बहुसंख्य इतिहासकार मानतात. मातीच्या विटा व भांडी भाजण्यासाठी लावल्या जाणाऱ्या भट्ट्यांसाठी मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड झाली. वृक्षतोडीला अन्यही करणे होती. हडप्पा संस्कृतीतील लोकांना शेवटी भारताच्या अन्य भागात स्थलांतरित व्हावे लागले.

वृक्षतोडीप्रमाणेच प्राणीहत्येचाही पुढील काळात अतिरेक झाला असावा. अनिर्बंध शिकारीमुळे अनेक जातीचे प्राणी दुर्मिळ होऊ लागले असावेत. सम्राट अशोकाने अहिंसेच्या तत्त्वासाठी आपल्या राज्यात प्राणीहत्येवर बंदी घातली; पर्यावरणाचा विचार त्यात कदाचित् नसावा. पण त्याने प्राणीहत्या बंदीसाठी आपल्या ५ क्रमांकाच्या शिलालेखांत काही विशिष्ट प्राण्यांची खास यादी दिलेली आहे. राघू, मैना, हंस, बटवाघळे, कासवे, मासे, साळींदर, बारासिंगा (एका जातीचे हरण) अशा काहींचा तीत समावेश आहे. हे प्राणी दुर्मिळ होत चालले आहेत याची जाणीव त्याला झाली असावी हे मान्य करण्यास हरकत नसावी.

सांचीच्या स्तूपाभोवतीच्या कोरीव काम केलेल्या दगडी कमानी म्हणजे जणू समृद्ध प्राणी संग्रहालये आहेत. या कमानींवरील सर्व कोरीव चित्रे वास्तव प्रकारांतील आहेत. कोरीवकाम इतके हुबेहुब आहे की पाहताक्षणी त्या त्या प्राण्यांची ओळख पटते. त्यांत मोर, हंस, पोपट असे पक्षी आहेत. हत्ती, गवे, हरणे, कोल्हे, सिंह, रानबोकड इत्यादी सस्तन प्राणी आहेत. सर्प आहेत. विविध प्रकारची फुलझाडे व वृक्ष आहेत. एका चित्रात बोधि वृक्षाचे रक्षण करणारे प्राणी दाखवले आहेत. मौल्यवान वृक्षांचे जतन करण्याची गरज असल्याची जाणीव यातून सूचित होते.

प्राचीन भारतीयांनी केलेले निसर्ग निरीक्षण आणि सजीव सृष्टीचा सूक्ष्म अभ्यास यांची झलक इतर अनेक कलाकृतीत बघावयास सापडते.

कौशांबी येथे सापडलेल्या गजलक्ष्मीच्या शिल्पात (इ.स.पू. २ शतक) दोन बाजूंनी दोन हत्ती गजलक्ष्मीवर आपल्या सोंडेतून पाणी ओतत आहेत असे दाखवले आहे. हत्तींची ही सवय आज आपल्याला चांगली परिचयाची आहे. बहुरुत येथील इ.स.पू. १ल्या शतकातील एका शिल्पात जातककथा चितारली आहे. तळ्याकाठी पाणी पिणाऱ्या हत्तीच्या पायाला खेकडा चावा घेत आहे. तळ्यात मासे विहरत आहेत. पोहणाऱ्या बदकाच्या तोंडात मासा दाखविण्यात आला आहे. या सर्व प्राण्यांचा आकार हुबेहुब उतरला आहे. हत्तींच्या स्वभावाचा आज सखोल अभ्यास झाला आहे. कळपातील हत्ती आपल्या पिलाला कधीही आपल्या समोरुन दूर होऊ देत नाहीत. सांचीच्या स्तूपातील एका शिल्पांत नेमका हा स्वभाव अगदी अचूकपणे टिपला आहे. पुंगी वाजवत, हातवारे करीत

नागाला झुलवणारा गारुडी केतण नारायण मंदिरांतील एका शिल्पात दिसतो. मौर्यकालिन सारनाथ स्तंभावरील सौष्ठवपूर्ण शरिर असलेले सिंह अजरामर झालेले आहेत. कोणार्क येथील छायादेवी मंदिरातील अभिषेकाचे पाणी बाहेर सोडणाऱ्या मगरीच्या तोंडातील दातांच्या घट्ट पकडीत मासा दाखविण्यात आला आहे. काळवीट व हरणे, त्यांच्यामधील नर व माद्या असा सूक्ष्म फरक तत्कालिन कलाकारांनी अचूक हेरला होता याचे प्रत्यंतर बहरुत व महावळीपुरम् येथील हरणांच्या चित्रीकरणावरुन येते. बहरुत मधील एका शिल्पात हत्तींभोवती जमलेल्या वानरांच्या मर्कटलीला कोरण्यात आल्या आहेत. एक वानर माहुताप्रमाणे अंकुश परजत आहे, एकजण हत्तीच्या दातांच्या आधारे त्याच्या मस्तकावर आरुढ होण्याच्या प्रयत्नात आहे. दोन कपी हत्तीच्या बाजूने चालत ताशा वाजवत आहेत. महावलीपूरम् येथील कपीकुटुंबाचे शिल्प तर अप्रतिमच गणावे लागेल. पिलू आईच्या अंगावर दूध पित आहे व आई त्याला लडीवाळपणे गोंजारत आहे. मादीच्या मागे बसून नर तिच्या केसातल्या उवालिखा काढीत आहे. अत्यंत प्रमाणशीर असलेले हे शिल्प दगडात कोरले आहे असे वाटतच नाही. खरोखरीचे एक माकड कुटुंब आपल्यासमोर बसले आहे असा भास होतो. अशाच प्रकारच्या सूक्ष्म निरिक्षणाचे पुरावे हंसशिल्पे आणि अन्य प्राणी यांच्या बाबतीत आढळतात. महावलीपुरमचे हत्तीशिल्प म्हणजे जणु आधुनिक कॅमेऱ्याने टिपलेले छायाचित्रच इतके ते शिल्प जिवंत आहे.

शिल्पामधून केवळ वन्यप्राण्यांच्या बाह्यांगाचाच अभ्यास दिसून येतो असे नाही. काही कलाकृतींत भावभावनांचेही दृश्य दिसते. त्याकाळात वन्यप्राण्यांची शिकार होत असली तरी तत्कालीन शिल्पांत त्यावर खास भर दिलेला आढळत नाही उलट रुरु जातक कथेवर आधारलेल्या एका शिल्पात एक हरीण सद्गुणांबद्दल उपदेश करीत, शिकार करणे थांबव असा राजाला उपदेश करीत आहे. बिहारमधल्या नवव्या शतकातील एका शिल्पात माणूस आणि प्राणी यांच्या मधल्या हृद्य संबंधांचे चित्रण आहे. एक पाळीव पक्षी आपल्या मालकिणीच्या मागे मागे जात असतांना तिचे लक्ष वेधण्यासाठी तिच्या अंगावरील वस्त्राचे खाली लोंबणारे टोक पकडत आहे. असे दृश्य त्यात आहे. दुसऱ्या एका शिल्पांत माणसाला प्राण्याबद्दल वाटणारे प्रेम व अनुकंपा दाखविली आहे. आपले आवडते हरीण मेल्यामुळे शोक अनावर झालेला एक संन्यासी त्या मृत हरणाला चेतना देण्याचा प्रयत्न करीत आहे. असा तो देखावा आहे.

शिल्पकलेप्रमाणेच मध्ययुगातील भारतात विकसित झालेल्या रंगीत लघुचित्रांमध्येही (miniature paintings) पक्षी, प्राणी व वनस्पती यांचे विविधांगी चित्रण केलेले आढळते.

कलेच्या या नमुन्यांच्या संक्षिप्त आढाव्यावरुन एक मुद्दा सहज लक्षात येतो. प्राचीन भारतात निसर्गातील विविध सजीव घटकांना लोकजीवनात अगदी जवळचे स्थान प्राप्त झाले होते. जाणते-अजाणतेपणी लोक त्यांचे सूक्ष्म निरीक्षणही करीत होते. एक प्रकारे तो निसर्गाचा अभ्यास होता. पशुपक्षी लोकांना आवडत होते. जे आवडते ते प्रदीर्घकाळ टिकायला हवे अशीच लोकांची भावना असणार ते टिकण्यासाठी काय करावे लागेल याचाही विचार लोकांच्या मनांत निर्माण झाला असणार ! नव्हे तो झाला होता. याचे अनेक ग्रांथिक पुरावे उपलब्ध आहेत. अर्थात् तो स्वतंत्र लेखाचा विषय आहे.

**डॉ. अरुण रा.जोशी,**
परचुरे यांचे घर, २ रा मजला,
विष्णुनगर, ठाणे - ४०० ६०२
दूरध्वनी : ५४३ ००७८

•••

---

निसर्ग हीं एक कला आहे.

# शांताराम राऊतांचे वेगळेपण

मार्गदर्शक - सौ. मंजिरी दांडेकर

*चित्रकला, विशेषत: बोधचिन्हांच्या क्षेत्रात भरीव कार्य करणारे राऊतसर आमच्या ठाण्यात राहतात. गेल्याच महिन्यात त्यांचा वाढदिवस झाला. ज्यांची बोधचिन्हे निवडली असे आंतरराष्ट्रीय बहुमान प्राप्त राऊत सर आमच्या विद्यार्थ्यांशी बोलले, विद्यार्थी त्यांना भेटले यातून लिहिला गेलेला हा लेख - संपादक*

आमच्या बाईंनी शातांराम राऊत सरांची मुलाखत घ्यायला याल का ? असे विचारल्यावर लगेच तयार झालो. कारण त्यांच्या चित्रांबद्दल मुखवट्यांबद्दल ऐकले होते. पण प्रत्यक्ष भेटीचा योग आला नव्हता. त्यामुळे बाईंनी विचारताच आम्ही लगेच तयार झालो. मुलाखतीचा दिवस ठरला. त्यांना विचारावयाचे प्रश्न मनात घोळवतच त्यांच्याकडे गेलो.



विद्यार्थ्यांशी बोलताना राऊत सर

दार उघडले ते सरांनीच. प्रसन्न, हसऱ्या मुद्रेने आमचे स्वागत झाले. मध्यम बांध्याचे, पांढरी सलवार, खादीचा नेहरु शर्ट, पांढरी दाढी आणि चष्मा असे राऊत सर बघताक्षणीच आवडले. त्यांना 'आम्ही तुमची 'दिशा' या मासिकासाठी मुलाखत घ्यायला आलो आहोत' असे सांगताच ते चटकन् म्हणाले, 'अरे माझ्यापेक्षाही मोठी कलाकार मंडळी ठाण्यात आहेत. मी मुलाखत देण्याइतका मोठा नाही.' हा त्यांचा विनय पाहून त्यांचे मोठेपण लक्षात आले.

मग गप्पांच्या ओघात त्यांनी खूप काही सांगितले. त्यांना मूळ प्रेरणा मिळाली ती त्यांच्या बहिणीकडून आणि मो.ह.विद्यालयातील श्री. कानिटकर सर यांच्याकडून. कानिटकर सरांनी राऊतांच्या कलेतले वेगळेपण ओळखले. तसेच सरांच्या वडिलांनीही त्यांना प्रोत्साहन दिले. शालेय शिक्षणानंतर सर जे.जे. स्कूल ऑफ आर्टमधे राऊत सरांनी दलालांसारख्या कलाकाराचा आदर्श समोर ठेवला. जे.जे. स्कूल ऑफ आर्ट मधे असताना तेथे इतर विषयांबरोबरच 'बोधचिन्ह' या विषयाचेही शिक्षण दिले जाई. शांताराम राऊतांसारखा सर्जनशील कलाकाराला हा विषय म्हणजे आव्हान वाटले व त्यांनी ते स्वीकारले या विषयी सांगताना ते म्हणतात.

बोधचिन्ह ही एक सर्जनशील कलाकाराची सृजनात्मक, कौशल्य पणाला लावून केलेली कला निर्मिती असते. ती साध्य करण्यास अनेक गोष्टींची आवश्यकता भासते. एक म्हणजे कोणत्याही विषयाबद्दलचे ज्ञान त्या त्या तज्ज्ञ व्यक्तींकडून ते मिळविण्याची व आकलन करण्याची त्यांची कुवत. ज्ञान हे दोन प्रकारचे असते. एक, जे तुम्ही स्वत: मेहनत परिश्रम व अभ्यास करुन आत्मसात केलेले असते ते व दुसरे म्हणजे जे ज्ञान तुम्हाला अवगत नाही ते कोठे मिळेल याचा अचूक अंदाज. याबरोबरच या संस्थेचे किंवा एखाद्या व्यापारी समूहाचे नवीन बोधचिन्ह करावयाचे असेल त्यांच्या प्रतिस्पर्धी संस्थेच्या बोधचिन्हाचाही अभ्यास केला पाहिजे. शिवाय कलात्मक,

नावीन्यपूर्ण व अर्थपूर्ण दिसेल अशी कौशल्यपूर्ण रचना निर्माण करता आली पाहिजे.


शिक्षण पूर्ण झाल्यावर उल्का ॲडव्हर्टायझिंग कंपनीमधे कामाला लागलो. माझे गुरु कै. चापगर, श्री. र.कृ. जोशी, श्री. बाल मुंडकर व श्रीम. ॲन मुकर्जी यांच्या प्रोत्साहनामुळे मी बोधचिन्हाचा अभ्यास केला व यश मिळवले असे ते म्हणाले.



राऊतसर -त्यांनी बनविलेल्या मुखवट्यांसह


बोधचिन्ह म्हणजे काय याचे उत्तर देताना त्यांनी सांगितले की बोधचिन्ह म्हणजे कोणत्यातरी इतर गोष्टीचा संदर्भ दाखवून सुचवलेले चित्र. सध्या संगणक युग सुरु आहे. व्यवसायाचा पसारा अनेक पटीने वाढला आहे. अशावेळी प्रसिद्धि माध्यमाद्वारे सर्वांना एकत्र आणण्यासाठी संस्थेच्या बोधचिन्हाची आकृती फार उपयोगी पडते. मी या बोधचिन्हांमधे भारतीय पारंपारिक कला प्रकारांचा विचार केला. बोधचिन्हाची निर्मिती प्रक्रिया सांगताना ते म्हणाले, जेव्हा एखाद्या संस्थेसाठी नवीन बोधचिन्ह संकल्पनेची कामगिरी स्वीकारतो तेव्हा प्रथम त्या संस्थेच्या सर्व अपेक्षित गोष्टींची नोंद करुन घेतो, अधिक माहितीसाठी स्वतंत्र अभ्यास व संशोधन करतो, कागदावर संभाव्य व अपेक्षित शक्यतांची यादी व चित्राकृती रचना रेखाटल्या जातात. याचबरोबर काही नकारात्मक गोष्टींचा देखील विचार करावा लागतो म्हणजे त्या विशिष्ट कलाकृतीतून काही गैरसमज होत नाहीत ना? काही धार्मिक अथवा सामाजिक नाजूकबाबी व्यक्त होत नाहीत ना ? या सर्वांचा विचार व्हावा लागतो. उदा. युद्धात जखमी झालेल्या सैनिकांना तटस्थ म्हणून वैद्यकीय उपचार करणाऱ्या रेडक्रॉस संस्थेचे बोधचिन्ह पांढऱ्यावर लाल क्रॉस असे आहे पण मुस्लिम देशांनी क्रॉस हा ख्रिश्चन धर्माचे प्रतीक आहे असे मानून त्यांनी क्रॉस ऐवजी लाल चाँद हे बोधचिन्ह निवडले.

बोधचिन्हाबद्दल प्रथमच पारितोषिक मिळाले.त्यावरची प्रतिक्रिया सांगताना त्यांनी म्हटले माझ्या चित्राला बक्षिस मिळाले. ते ही आंतरराष्ट्रीय स्तरावर हे वडिलांनी मला सांगितले. पण माझा विश्वासच बसेना कारण चित्र स्पर्धेसाठी पाठवून सहा महिने झाले होते. वडिलांनी पारितोषिक जाहीर झाल्याचे पत्र दाखवले. तेव्हा खूपच आनंद झाला. यातूनच स्फूर्ती मिळाली. प्रोत्साहन मिळाले व पुढे स्पर्धात भाग घेतच गेलो. अनेक बक्षिसे मिळाली अर्थात काही ठिकाणी अपयशही आले. लोकांना माझे फक्त यश दिसले कारण ते हिमनगासारखे १/३ पाण्याच्या वर आहे व २/३ अपयश पाण्याच्या खाली आहे.



पारंपारिक प्रतीकांचा उपयोग करताना आकड्यांची सरस्वती, स्वस्तिक व कमळ यांचा वापर केला. दहा दिशांना भटकणाऱ्या मनाला एकाग्रता आणून देणारे चिन्ह म्हणजे स्वस्तिक. या स्वस्तिकाचा उपयोग करून त्यांनी अनेक देवदेवतांची प्रतीके तयार केली आहेत. उदा. गणपती, दशावतार, शंकर, कृष्ण इ.

स्वस्तिक स्वरुप मंगल चित्रे व देव देवतांची प्रतीके.





स्वस्तिक स्वरुप गणेश



स्वस्तिक स्वरुप दशावतार

निसर्गाचा एक स्पर्श सर्व जगाशी नाते जोडून टाकतो - शेक्सपियर

आपल्या कलाकृतीत कमीत कमी रेषेत सूचकतेने मांडणी करून त्यांनी पोस्टर्स, बोधचिन्हे व पुस्तकांची मुखपृष्ठे तसेच सामाजिक, जनजागृती यासारख्या विषयावरील भारत व आंतराष्ट्रीय पातळीवरील स्पर्धेत पारितोषिके मिळवली आहेत.




न्यूयॉर्क येथे संयुक्त राष्ट्राने आयोजित केलेल्या वर्णद्वेषाविरुद्ध लढा देणाऱ्या परिषदेच्या पोस्टरसाठी ५०० डॉलरचे पारितोषिक.



संयुक्त राष्ट्राने आयोजित पोस्टर स्पर्धेतील प्रथम क्रमांकाचे पारितोषिक.

आंतरराष्ट्रीय स्पर्धेत त्यांना संयुक्त राष्ट्राने आयोजित केलेल्या मानवी हक्कांविषयीच्या धोरणावरील स्पर्धेत चार वेळा पारितोषिक मिळाले. या कलाकृती वर्णद्वेष या विषयावर होत्या.




संयुक्त राष्ट्राने आयोजित केलेल्या वर्णद्वेषाविरुद्ध पोस्टर स्पर्धेतील पारितोषिक. विजेते पोस्टर पारितोषिक. (आफ्रिका व आशिया)

या विषयी सांगताना ते म्हणाले, 'आपण केलेली कलाकृती साधी पण दुसऱ्यांच्या हृदयाला जाऊन भिडणारी हवी असे मी मानतो.' एक चित्र हजार शब्दांचे काम करू शकेल अशी कलाकृती निर्माण करण्यासाठी सतत प्रयत्न करणे, सतत त्यावरच विचार करणे यातून हे सारे यश मिळवले.

त्यांचे वेगळेपण दाखवणारे आणखी एक पोस्टर पाहिले. ३१ ऑक्टो. ९४ रोजी श्रीम. इंदिरा गांधी यांची निर्घृण हत्या करण्यात आली या प्रसंगावरील हे चित्र होते. यात एक कबुतर रडते आहे असे दाखवले आहे. फक्त कबुतराच्या डोळ्याच्या जागी पृथ्वी दाखवली होती. चित्राच्या खाली फक्त 'न्यू दिल्ली ३१ ऑक्टो. ८४' एवढीच अक्षरे लिहिली होती. या पोस्टरला प्रथम क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त झाले.

---

निसर्गात बेढौल व कुरुप वस्तूच नाहीत.




श्रीमती इंदिरा गांधी यांना श्रद्धांजली पारितोषिक विजेते पोस्टर.

या सर्व चित्रांवरून मग त्यांनी 'बोधचिन्ह' नावाचे, नवीन पिढीला उपयुक्त, मार्गदर्शक असे पुस्तक लिहिले. मराठी भाषेतील हे पहिलेच पुस्तक आहे.

चित्रकले शिवाय त्यांचा आवडता छंद म्हणजे मुखवटे तयार करणे. या छंदाकडे ते योगायोगाने वळले. त्याचे असे झाले की ठाण्यातील एका नाट्यसंस्थेने एक नाटक बसवले होते. त्यात मुखवट्यांचा वापर होता. त्यासाठी त्यांनी मुखवटे केले. तत्पूर्वी जपान, श्रीलंका, आफ्रिका येथील मुखवट्यांचा त्यांनी अभ्यास केला. यातूनच हा छंद जन्मास आला. यात त्यांनी काही लाकडाचे, कागदाचे, पुठ्ठ्याचे असे विविध प्रकारचे, आकाराचे मुखवटे बनवले. आतासुद्धा वयाच्या ६८व्या वर्षी त्यांना जगातील विविध प्रकारचे मुखवटे बनवून त्याचे प्रदर्शन भरवायचे आहे. एखाद्या तरुणालाही लाजवील असा त्यांचा उत्साह पाहिला, कलेविषयी भरभरुन बोलणे ऐकले. अर्ध्या पाऊण तासात मुलाखत संपेल असे वाटले होते. पण १॥ / २ तास कुठे गेले समजलेच नाही.

अशा या ऋषितुल्य, विनयशील व्यक्तिमत्त्वाची ओळख झाली हे आमचे भाग्य.

कु. अश्विनी डहाळे, कु. मधुरा कदम, चि.. प्रणव पेंडसे, चि. देवेंद्र पंचभाई [(९वी अ, डॉ. बे.वि. मंदिर (मा.वि.)] (मार्गदर्शन - सौ. मंजिरी दांडेकर)

• • •




---

निसर्गावर ताबा मिळवायचा असेल तर त्याच्या आज्ञेचे पालन करा. - फ्रान्सीस बेकन

# नेटवर्क वापरा, तात्काळ माहिती मिळवा !

श्री. प्रवीण वि. प्रधान

*इंटरनेट ! आजच्या माहिती युगातील महामार्ग. या इंटरनेट बद्दलचे शब्द, संकलपना यांनी भाषाच बदलू लागली आहे. या कल्पनांचा परिचय या लेखातून करून दिला आहे. माहिती क्षेत्रातील श्री. प्रवीण प्रधान यांनी - संपादक*

शालेय विद्यार्थी, गृहिणी, उद्योजक, व्यावसायिक, वयोवृद्ध अशा समाजातील सर्व व्यक्तींना कॉम्प्युटरचे वाहन 'मूषक' (माऊस) वापरून विश्वातील माहितीचे भांडार खुले करणाऱ्या 'इंटरनेट' चा जनक नेटवर्क हा २०व्या शतकातील माहितीच्या तंत्रज्ञानाचा चमत्कार व २१व्या शतकातील अनभिषिक्त सम्राट आहे. त्याचे असे झाले, १४५० च्या सुमारास जर्मनीतील गटेनबर्ग याने आधुनिक छपाई यंत्राचा शोध लावला व पुस्तकांचा, म्हणजेच माहितीयुगाचा प्रारंभ झाला. विज्ञानातील प्रगतीबरोबरच एकमेकांच्या विचारांची देवाणघेवाण करण्याची माणसाला अत्यंत गरज भासू लागली व त्यामुळे टेलिग्राफ, टेलिफोन, रेडिओ तसेच झेरॉक्स व कॉम्प्युटरचा वापर सुरु झाला. त्यानंतर नेटवर्क व त्याचे 'अपत्य' इंटरनेट यांनी तर माहिती शास्त्रात आमूलाग्र क्रांती केली. २०व्या शतकाच्या अखेरीस नेटवर्क व इंटरनेट या माहिती तंत्रज्ञानातील चमत्कारामुळे ग्रंथालय व माहिती व्यवस्थापन शास्त्राचे कार्यक्षेत्र अधिक व्यापक व महत्वपूर्ण झाले.

साध्या करमणूक क्षेत्रातील ते वैचारिक संशोधन क्षेत्रापर्यंत संचार असणारा इंटरनेट (नेटवर्क) हा विश्वव्यापी आहे. तुम्ही 'टायटॅनिक, ज्युरासिक पार्क, कॅस्पर, अपोलो १३' हे अलिकडे प्रकाशित झालेले 'कॉम्प्युटर' चमत्कृतीवर आधारित चित्रपट पाहिले असतील. कॉम्प्युटरच्या सहाय्याने निर्माण केलेल्या चलत् चित्राच्या आभासाचे हे अद्भुत चित्र म्हणजे 'सायबरस्पेस', पर्सनल कॉम्प्युटर (पी.सी.), सी.डी. रॉम व मल्टिमिडिया यांच्या कक्षेत पोचले आहे. तंत्रज्ञानामुळे कॉम्प्युटरचे डिजिटल रूप 'सायबरस्पेस' हा शब्द विल्यम गिबसन याने १९८४ साली आपल्या 'न्यूरोमॅनिक्स' या पुस्तकात वापरला. अशा घडामोडींच्या दखल घेणाऱ्या अमेरिकेतील 'टाइम' या प्रचंड खपाच्या नियतकालिकाने गेल्या ३-४ वर्षात गौरविलेल्या व्यक्ती या २०व्या शतकातील माहिती तंत्रज्ञानात क्रांती घडविणाऱ्या आहेत. 'मॅन ऑफ द इयर' म्हणून १९९६ साली मायक्रोसॉफ्ट कंपनीचे बिल गेटस्, आज जगातील ९० टक्के कॉम्प्युटरमधे ज्यांच्या कंपनीच्या चीप्स वापरल्या जातात त्या 'इंटेल' या विश्वव्यापी कंपनीचे प्रमुख अँड्र्यू ग्रोव्ह १९९७ साली, तसेच १९९८ साली 'जगातील अतिश्रीमंत माणूस ' म्हणून बिल गेटस् व व 'जगातील अतिश्रीमंत भारतीय' म्हणून भारतातील विप्रो (WIPRO) कंपनीचे प्रमुख अझिम प्रेमजी. ही गौरविलेली व्यक्तिमत्त्वे म्हणजे २१व्या शतकाच्या उंबरठ्यावर माहिती तंत्रज्ञानाला (इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी) येणारे असामान्य महत्त्वाचे निर्देशक आहेत.

### नेटवर्क

या महत्त्वपूर्ण तंत्रज्ञानाचा उदय पेंटॅगॉन या अमेरिकन लष्करी संघटनेमधे शीतयुद्धाच्या पार्श्वभूमीवर अत्यंत गुप्तपणे झाला. महायुद्ध सुरू झाल्यास वेगवेगळ्या ठिकाणच्या संरक्षण अधिकाऱ्यांमध्ये व्यवस्थित संवाद (कम्युनिकेशन) व्हावे, तसेच संदेश, माहिती

एकमेकांकडे नीट पोहोचावी या प्रमुख हेतूने पेंटॅगॉनच्या 'ॲडव्हान्स्ड रिसर्च प्रॉजेक्ट्स एजन्सी (अर्पा) ने अनेक प्रस्ताव मांडले ते असे.

(अ) टेलिकॉन्फरन्सिंग : वेगवेगळ्या दूरदूरच्या ठिकाणी असलेली महत्त्वाची मंडळी एकाच खोलीत असल्याप्रमाणे बोलू शकणार होती.

(ब) व्हर्च्युअल रिॲलिटी : कॉम्प्युटरच्या सहाय्याने वेगवेगळ्या गोष्टींचे, परिस्थितीचे, स्पर्शाचे, वातावरणाचे आभास निर्माण करणे.

(क) ईलेक्ट्रॉनिक मेल (ई-मेल) : महत्त्वाची माहिती बिटस्‌च्या स्वरुपात कुणाला नकळत एकमेकांना पाठविणे.

संरक्षण खात्याच्या गुप्ततेमुळे नोकरशाहीच्या कठोर नियमातून मुक्त असे बेबंद नेटवर्क पेंटॅगॉन सुरु केले. त्यातूनच 'अर्पानेट' निघाले आणि त्याच नेटवर्कचे मग पुढे झाले 'इंटरनेट' ! नेटवर्क माहितीच्या महामार्गाची (इन्फर्मेशन सुपरहायवे) हीच सुरवात !!

कॉम्प्युटर एकमेकांना जोडणं म्हणजे फक्त तारांची जोडणी नसून त्यासाठी हार्डवेअरची बरीच उपकरणे आणि सॉफ्टवेअरचे बरेच प्रोग्रॅम्स्‌ लागतात. साधारण १९६१ मधे दोन कॉम्प्युटर्स जोडून सुरु झालेल्या नेटवर्कची कक्षा १९८५ मधे उपलब्ध झालेल्या स्वस्त व शक्तीशाली पर्सनल कॉम्प्युटरमुळे (पी.सी.) वाढत गेली. आता तर टेलिव्हिजन आणि इंटरनेट याची तंत्रे एकत्र आल्यामुळे घरच्या टी.व्ही. वरुनच इंटरनेटला आपण जोडले जाऊन अंदाजे ७ कोटी पानांवरील वैविध्यपूर्ण माहितीचा खजिना आपल्यासमोर खुला होणार आहे !

नेटवर्कद्वारे एकमेकांकडील माहितीची देवाण घेवाण करुन एकमेकांशी सुसंवाद साधण्याची पुढची पाऊले लॅन, मॅन आणि वॅन. एकाच इमारतीत असलेले सर्व कॉम्प्युटर्स एकमेकांना जोडले की त्यांना 'लोकल एरिया नेटवर्क ' (लॅन) असे म्हणतात. एकाच कंपनीची एकाच गावातील वेगवेगळ्या विभागातील कार्यालयातील कॉम्प्युटर एकमेकांशी जोडले तर त्याला 'मेट्रोपॉलिटन एरिया वर्क' (मॅन) असे म्हणतात. तसेच एखान्या कंपनीची मुंबई, लंडन, न्यूयॉर्क आणि सिंगापूर येथे कार्यलये असतील आणि तिथले कॉम्प्युटर्स जर एकमेकांशी जोडले तर त्यांना ' वाईड एरिया नेटवर्क' (वॅन) असे म्हणता येईल. कॉम्प्युटरला 'डेटा बेस सर्व्हर' म्हणतात. या कॉम्प्युटरमधे असलेली माहिती सगळ्यांना पुरविण्यासाठी खास असे प्रोग्रॅम्स्‌ लागतात. गोपनीयतेच्या दृष्टीने कुठली माहिती मागितली तर द्यायची किंवा नाकारायची या दृष्टीने संबंधित व्यक्तींना सर्व्हरला सांगावे लागते. त्यामुळे माहिती सुरक्षित रहाते.

## वैशिष्ट्ये

नेटवर्कचे आधारस्तंभ म्हणजे ईलेक्ट्रॉनिक मेल, माहितीकेंद्र (डाटाबेसेस) व फाइल ट्रान्सफर. ई-मेल हे एकमेकाशी संपर्क साधून माहितीची देवाणघेवाण करण्याचे आधुनिक तंत्र आहे. डेटाबेसमध्ये, पुस्तक, मासिक, पेटंट इ. प्रकाशनांतील तसेच वेगवेगळ्या विषयांवर भरपूर माहिती साठवलेली असते व ते ऑन-लाईन किंवा ऑफ-लाइन माध्यमातून तात्काळ मिळविता येते. 'फाईल ट्रान्सफर' म्हणजे दूर असलेली कॉम्प्युटर मधील माहिती स्थानिक कॉम्प्युटरमध्ये 'ट्रान्सफर' करणे. या माध्यमांद्वारे माहितीची 'वाहतुक' करणारे प्रमुख 'वाहन' म्हणजे इंटरनेट!

## इंटरनेट

जगभरातील नेटवर्कस्‌चे नेटवर्क (महाजाळे) असे इंटरनेटचे वर्णन करता येईल. या महाजाळ्यांची मूळ कल्पना सन १९४४ मध्ये मॉर्सन या वैज्ञानिकाने लावलेल्या टेलिग्राफच्या शोधात आहे. '' या शोधामुळे सगळे जग हे एका मेंदूप्रमाणे बनले आणि त्यातले अनेक विभाग

एकमेकांशी जोडले जाऊन ते प्रचंड अवळ येईल'' असे भाकित हॉनॉर्थ या अमेरिकन कादंबरीकाराने १९५१ सालीच केले होते. या विधानाच्या आधारे प्रसिद्ध कॅनेडियन विचारवंत मार्शल मॅक्लुहान याने 'ग्लोबल व्हिलेज (जागतिक खेडे)' हा शब्द ही अशा जगाचे वर्णन करायला वापरला होता. इंटरनेट म्हणजे ग्लोबल व्हिलेजमधले गल्लीबोळ आणि महारस्ते असेही म्हणता येईल. आज घराघरातून 'माहितीचे मायाजाल' पसरविणाऱ्या इंटरनेटशी अनेक लहानमोठी नेटवर्कस् जोडली गेली आहेत व त्यामुळे कुठल्याही कॉम्प्युटरवरची माहिती दुसरीकडे कुठेही पाहता येते. शिवाय यामुळे एकमेकांना ई-मेलच्या सहाय्याने पत्र पाठवता येतात. अस्तित्वात असेलेल्या टेलिफोनच्या व इतर माध्यमांचा इंटरनेटसाठी वापर करण्यात आल्याने ते चटकन वाढत जाऊन लोकप्रिय झाले. अलिकडे ऑप्टिकल फायबर हा जास्त वापरतात. यातून विजेच्या प्रकाशाचा वापर करुन माहिती पाठविण्यात येते.

इंटरनेटला जोडण्यासाठी एक पी.सी. तसेच एक 'मोडेम' नावाचा उपकरणाची व टेलिफोनची जरुरी असते. या मोडेमद्वारे डिजिटल सिग्नलचं टेलिफोनच्या तारांतून जाऊ शकेल अशा ॲनॉलॉग सिग्नलचे रुपांतर केल जाते. पी.सी. व मोडेम इंटरनेटच्या एका कॉम्प्युटरला जोडल्यानंतर मोडेमनिर्मित आवाजाच्या लहरीचे सिग्नल टेलिफोनद्वारे दुसऱ्या कॉम्प्युटरकडे जातात. तेथील दुसरा मॉडेम या ॲनॉलॉग सिग्नलच पुन्हा बीटस्‌मध्ये रुपांतर करते आणि मग तो दुसऱ्या कॉम्प्युटरवर प्रक्षेपित होतो. इंटरनेटचे कनेक्शन जो देतो त्याला 'इंटरनेट सर्व्हिस प्रोव्हायडर' किंवा आय.एस.पी. म्हणतात. भारतात विदेश संचार निगम लिमिटेड, महानगर टेलिफोन निगम या सरकारी कंपन्यांशिवाय आता कांही खाजगी कंपन्यासुद्धा हे काम करतात. या आय.एस.पी. च्या द्वारे आपण इंटरनेटशी जोडले जातो. आपला टेलिफोन नंबर सारखाच प्रत्येकाला एक ई-मेलचा पत्ता असतो. इंटरनेटचे कनेक्शन मागितले की आय.एस.पी. च आपल्याला तो पत्ता देतो. एकदा इंटरनेटचे कनेक्शन मिळाले की नळातून पाण्याचा वापर करावा त्याप्रमाणे जगभरातील माहितीचा ओढा तुमच्या घरात सुरु होतो !

वेबसाईटस्

इंटरनेटचा 'प्राण' असलेल वर्ल्ड वाईड वेब (www) उर्फ वेब हे जागतिक माहितीचं एक मोठ भांडारच आहे. यामध्ये असंख्य वेब साईटस् आहेत. आपल्याला इंटरनेटवरून जी वेगवेगळ्या विषयांवरची माहिती मिळते ती जगभराच्या हजारो वेबसाईटवरून मिळते. अगदी सुरवातीला अनेक विद्यापिठातून चाललेल्या संशोधनाविषयी वेगवेगळ्या शास्त्रज्ञांना माहिती व्हावी या हेतुने इंटरनेट व वर्ल्ड वाईड वेब याचा वापर होऊ लागला. प्रत्येक विद्यापिठात व तेथल्या वेगवेगळ्या विभागात असलेल्या वेबसाईटस्‌ची उपयुक्तता लक्षात घेताच त्यांचा जाहिरातीसाठी वापर करता येईल. याची लोकांना कल्पना आली. यातूनच पुढे वेबवर वेगवेगळ्या उपयुक्त, चित्रविचित्र व माहिती पुरवणाऱ्या वेबसाईटस् सुरु झाल्या. अफाट माहिती असणाऱ्या कांही ठळक वेबसाईटस् खालीलप्रमाणे आहेत :

- ☆ शैक्षणिक, कला, करमणूक, संस्कृती, पर्यटन, खेळ इ.
- ☆ कंपन्याची माहिती
- ☆ व्यापार व उद्योग
- ☆ आर्थिक क्षेत्र
- ☆ वर्तमानपत्र, मासिक छपाई
- ☆ हवामान
- ☆ आयात - निर्यात
- ☆ संशोधन
- त नोकऱ्यासंबंधी
- ☆ वैमानिक, इंजिनियरींग, इ. क्षेत्रातील ट्रेनिंग

निसर्ग हा खरा कायदा आहे. - जॉन फ्लोरिओ.

- वैद्यकीय माहिती
- धार्मिक माहिती
- रेल्वे सेवा
- संरक्षण क्षेत्र
- शासकीय कामकाज
- नवीन मित्र जोडणे

प्रत्येक विषयावरील वेबसाईटचा डब्ल्यू. डब्ल्यू. डब्ल्यू. ने सुरु होणारा पत्ता असतो. १९८९ साली टिम बर्नस ली कडून 'वेबची' कल्पना निघाल्यानंतर आतापर्यंत हजारो वेबसाईटस् सुरु झाल्यात. एवढ्या असंख्य वेबसाईटमधून आपल्या हव्या त्या विषयांवरील अचूक पत्ते शोधण्यासाठी 'सर्च इंजिन' नावाचा प्रोग्रॅम निघाला. हा प्रोग्रॅम जगातल्या सगळ्या 'सर्वर्स' वरच्या सगळ्या वेबसाईटस् तपासून बघतो आणि कुठल्याही विषयावर कुठल्या वेबसाईटस् आहेत त्यांचे विषय आणि पत्ते यांची एक सूची (इंडेक्स) करुन ठेवतो. आपल्याला पाहिजे तो विषय आपण या प्रोग्रॅमला सांगितला की या इंडेक्सवरून तो या विषयाची सगळ्या वेबसाईटस्ची यादी आपल्याला देतो. आपण पाहिजे ती वेबसाईट निवडून त्यावर क्लिक केले की त्या वेबसाईटचा पत्ता वापरून त्याची 'पेजेस' आपल्या कॉम्प्युटरवर दिसू लागतात! याहू, स्टार्टिंग पॉइंट, देजान्यूज, ओपन टेक्स्ट अशी बरीच सर्च इंजिन्स आज इंटरनेटवर आहेत.

या वेबवरची पान वाचणं 'ग्लायडिंग' किंवा 'सर्फींग' म्हणतात. तसेच 'चॅट' मोड वापरून आपण इतर नेट वापरणाऱ्यांशी 'गप्पा' मारु शकतो ! फक्त यामधे बोलण्याऐवजी टाईप केलेल्या या गप्पा माराव्या लागतात!

**ईलेक्ट्रॉनिक मेल (ई-मेल)**

आपला जसा पोस्टाचा पत्ता असतो तसाच ई-मेलमधे प्रत्येकाला ई-मेल आय.डी. असतो. ई-मेल केव्हाही कुठूनही येऊ शकतो. यासाठी एरव्ही कॉम्प्युटर सतत चालू ठेवावा लागला असता. हे टाळण्यासाठी आता 'ई-मेल सर्व्हर्स' निघाले आहे. हे सर्वर कॉम्प्युटर रात्रंदिवस चालू असतात. एका सर्वरवर अनेक लोकांची पत्र किंवा संदेश साठ्वून ठेवता येतात. या सर्वरवरच्या डिस्कवर जी जागा राखून ठेवतात. त्यालाच 'मेल बॉक्स' असं म्हणतात. तुम्ही जेव्हा ई-मेल सुरु करता तेव्हा त्या सर्वरचा सॉफ्टवेअर प्रोग्रॅम तुमची मेल बॉक्स तपासतो आणि तुमच्या कॉम्प्युटरवर सगळ्या पत्रांची संक्षिप्त यादी पाठवतो. त्यातले एखादे पत्र निवडल्यावर ते पूर्ण पत्र कॉम्प्युटरवर पाठवणं, ते वाचून झाल्यावर ते आता जुने झाले आहे अशी खूण करणे, ते नष्ट (डिलीट)करण्याची आज्ञा दिल्यास ते 'ट्रॅश' या कप्प्यात घालून नष्ट करणे ही सगळी कामं सर्वरवरचे ई-मेल सॉफ्टवेअर करते. एखादं पत्र वाचल की त्याला उत्तरही तुम्ही देऊ शकता. ज्याला उत्तर पाठवायचे त्याचा ई-मेल आय.डी. (टू आणि फ्रॉम) यांची अदलाबदल केली की झाले ! पत्राचा जो विषय दिलेला असतो तो मग पाठवणाऱ्याने 'विषय' या सदराखाली खास द्यावा लागतो.

एखादा लेखक आपल हस्तलिखित प्रकाशकाला ई-मेल द्वारे पाठवू शकतो व ते प्रकाशित झाल्यावर त्याची ई-प्रिंट त्याला मिळू शकते. मासिकांमधील लेखांची यादी ई-मेल द्वारे कार्यालयातील उच्च अधिकाऱ्यांपासून संशोधन, मार्केटिंग, पर्सोनल अशा सर्व विभागांना पाठविता येते. उत्पादक आपल्या मालाच्या जाहिरातींसाठी ई-मेलचा पुष्कळ उपयोग करतात. ग्रंथालय, उद्योजक, शैक्षणिक संस्था इ. प्रत्येक क्षेत्र आपल्या योग्य कामासाठी ई-मेलचा वापर करतात. थोडक्यात म्हणजे, जे काम पोस्ट ऑफिस करते ते सर्व काम ई-मेल चटकन करते.

**यूजनेट**

इंटरनेटवर असलेली आणखी एक सोय म्हणजे, 'यूजनेट', म्हणजेच 'यूर्जस नेटवर्क', सूचना लिहायला

निसर्ग चिन्हांनी व खुणांनीच बोलतो.

शाळा, कॉलेजमधे लावण्यात येणाऱ्या नोटीस बोर्डप्रमाणेच 'यूजनेट' असते. असे हजारो नोटीस बोर्ड असणाऱ्या यूजनेटमधे जगातील कुठल्याहि ओळखीच्या किंवा अनोळखी व्यक्तींशी गप्पा किंवा चर्चा करण्याची सोय असते. नोटीस् बोर्डला यूजनेटच्या भाषेत 'न्यूजग्रुप' म्हणतात. उपलब्ध असलेल्या हजारो न्यूजग्रुपपैकी आपल्याला पाहिजे त्या न्यूजग्रुपमधे आपण वर्गणीदार होऊ शकतो. यामुळे दरवेळी न्यूजनेट चालू केल्यावर त्या निवडक न्यूजग्रुपसकडेच आपण जाऊन पोहोचतो.

### हॉटमेल

फुकट ई-मेल म्हणजेच 'हॉटमेल'! तुम्हाला हॉटमेल वापरायचा असेल तर तुम्हाला चटकन एक खाते (अकौंट) विनामूल्य मिळतं. तुम्हाला येणाऱ्या पत्रांसाठी डिस्कवर राखीव जागा असते आणि नेहमीच्या ई-मेलसारखीच कोणालाही पत्र पाठविण्याची सोय असते. विशेष म्हणजे जगात कुठूनही तुम्ही या सोयीचा फायदा घेऊ शकता. एक तर फुकट आणि जगात कुठही पोहोचणारे हे हॉटमेल एवढे लोकप्रिय झालय की आज घडीला दररोज ७५,००० माणसं हॉटमेलमध्ये नवीन खाती उघडतात ! त्याची लोकप्रियता बघून त्यावर जाहिरात करण्यासाठी मग कंपन्यांची हॉटमेलवर रीघ लागली. या जाहीरातीसाठी जे भरभक्कम पैसे आकारले जातात तेच हॉटमेलचे उत्पन्न. हॉटमेलमधे (फुकट) खात उघडण्यासाठी तुमच नाव-गाव सोडून तुमच वय, व्यवसाय, छंद, याविषयी माहिती द्यावी लागते. हॉटमेल ही वर्ल्ड वाईड वेबसारखीच एक साईट असल्यामुळे ते वापरायला तुम्हाला वेगळा ई-मेलचा प्रोग्रॅम लागत नाही. अभिमानाची गोष्ट म्हणजे सबिर भाटिया या भारतीयाने १९९६ रोजी सुरु केलेल्या हॉटमेल कंपनीचे पहिल्याच वर्षी १ कोटींहून अधिक सभासद झाले. या कल्पनेचा आवाका बघून 'मायक्रोसॉफ्ट' चे बिल गेटस् इतके प्रभावित झाले की जानेवारी १९९८ मधे त्यांनी हॉटमेल सबिर भाटियाकडून अंदाजे १,५००-१,८०० कोटी रुपयांना विकत घेतले !

### मल्टिमीडिया

माणसाची इतरांशी संवाद (कम्युनिकेशन) करताना जी कृती असते त्याचेच प्रतिबिंब म्हणजे कॉम्प्युटरची मल्टिमीडिया ही कल्पना. आपण ज्याप्रमाणे बोलतो, ऐकतो, लिहितो, हावभाव करतो आणि गातो याच गोष्टी टिप बर्नर्स ली या गणित तज्ज्ञाने १९९१ साली इंटरनेटवरून मल्टिमीडियात वापरल्या. अक्षरं, आकडे, चित्र, चलत चित्र आणि आवाज अशा माध्यमातील माहिती ० आणि १ च्या डिजिटल स्वरूपात साठवून एका ठिकाणाहून दुसरीकडे पाठवता येऊ लागली. पदार्थ विज्ञानातल्या संशोधनाची सर्व माध्यमातील माहिती मल्टिमीडियाद्वारे सर्वांना उपलब्ध करण्यासाठी सुरु केलेले हे माध्यम आता उद्योग, व्यापार, ग्रंथालय, जाहिराती इ. अनेक क्षेत्रात उपयुक्त झाले आहे.

### व्हॉईस मेल

या अत्याधुनिक स्वरुपाच्या ई-मेलमध्ये आपला संदेश टाईप न करता ज्या व्यक्तींशी बोलायचे असेल तिच्या नावाने टेलिफोनवर डिक्टेट करायचा असतो. कॉम्प्युटर तो संदेश रेकॉर्ड करतो. साठवून ठेवतो आणि जेव्हा पाहिजे तेव्हा त्या व्यक्तीकडे पोहोचवतो. ई-मेल प्रमाणेच व्हॉईस मेलवरील संदेश वाचता येतात. अतिमहत्त्वाच्या कामासाठी व्हाईस मेल फार उपयुक्त आहे.

### टेलिफॅक्स (फॅक्स)

अत्यंत लोकप्रिय प्रकारच्या या ई-मेलसारख्या माध्यमाद्वारे पत्र, लेख इ. जशीच्या तशी टेलिफोनवरून तात्काळ पाठविण्याची उत्तम सोय झाली आहे.

### ... आणि तुम्ही इंटरनेटचे वाचक !

नेटवर्क, म्हणजेच इंटरनेटचा वापर करून तात्काळ माहिती मिळविणाऱ्या वाचकांचा नुकताच आढावा घेतला

---

असता असे दिसून आले की व्यापार / उद्योगासंबंधी ३२%, शैक्षणिक १७.९%, माहिती तंत्रज्ञान ११.३%, वैद्यकीय ४.७%, इंजिनियरिंग ४.३%, सल्लागार (कन्सलटंट)२.२% अशा क्षेत्रातील माहितीसाठी शालेय विद्यार्थी, गृहिणी, उद्योजक इ. वाचकांनी इंटरनेटचा उपयोग केला. कॉम्प्युटरच्या मूषकावर (माऊस!) स्वार होऊन ही माहितीची क्रांती तुमच्या आमच्या दारावर टकटक करू लागली आहे. तिचे स्वागत करा व तुमचा स्वतःचा तसेच तुमच्या कार्यसंस्थेचा सर्वांगीण विकास करण्यासाठी या जागतिक माहितीच्या खजिन्याचा सतत उपयोग करा. नव्या युगाचा वेध घेऊन तुम्हाला योग्य वेळी, योग्य माहिती देऊन कर्तृत्त्ववान करण्याची शक्ती या माहितीच्या खजिन्यात आहे.

**प्रवीण वि. प्रधान**
७३/१०२, सोनचंपा, वसंत विहार, पोखरण नं. २,
ठाणे (प.) ४०० ६०१.
दूरध्वनी : ५४२५९२६.

•••

## दिलगिरी

ऑगस्ट ९९ च्या अंकामध्ये विद्या प्रसारक मंडळाच्या १९९९ - २००० वर्षासाठी निवडण्यात आलेल्या कार्यकारिणीच्या सदस्यांची नावे फोटोसह दिली होती. त्यांत उभ्या असलेल्या सभासदांच्या नावामध्ये चूक झाली. त्याबद्दल दिलगिरी व्यक्त करून कार्यकारिणीचा तोच फोटो परत छापत आहोत. झालेल्या चुकीबद्दल क्षमस्व ! - संपादक



कार्यकारिणी मंडळ -विद्या प्रसारक मंडळ १९९९ - २०००

बसलेले (डावीकडून) - श्री. ल.ग.देव, श्री. मा.य. गोखले (कोषाध्यक्ष), श्री. अ.धों.टिल्लू (कार्याध्यक्ष), डॉ.वा.ना. बेडेकर (अध्यक्ष), श्री. श्री.वि. करंदीकर (उपाध्यक्ष), श्री.अु.भा. जोशी (कार्यवाह)

उभे (डावीकडून) - श्री. द.वा. खर्डे, श्री. मा.ना. पाटील, श्री. दि.गु. जोशी, डॉ. अ.ना. वापट, श्री. वि.ना. मराठे.

निसर्गामध्ये कसलाही हस्तक्षेप हा धिक्कार करण्याजोगा आहे. हस्तक्षेपामुळे केवळ निसर्गालाच भोगावे लागत नाही, तर माणसांनाही त्यापासून त्रास भोगावा लागतो.

# मन

सौ. अचला महाजन

*मन हे अगम्य गूढ. सागराचा थांग पत्ता लागेल पण मनाचा लागणे केवळ अशक्य ! या मनाबद्दलचे हे प्रकट चिंतन- संपादक*

*मनही देवता मनही ईश्वर मनसे बडा न कोय ।*

*जगसे चाहे भागले कोई मनसे भाग न पाये ।*

मानसशास्त्रातून मनावर कितीही संशोधन झाले तरी मन एक अगम्य गूढ अशीच गोष्ट आहे. प्रकाश आणि ध्वनी वेगापेक्षाही मनाचा वेग कित्येक कोटी योजने असू शकतो. मनाने निर्गुण, निराकार परमेश्वराशी बोलू शकतो. मन ही अत्यंत गुंतागुंतीची गोष्ट आहे.

कधी कधी मन कोठे तरी अविचारांच्या मागे सुद्धा भरकटत जाते. उदाहरणादाखल पेपरमध्ये वाचलेली बातमी. एका सहा वर्षाच्या मुलाने आपल्या लहान भावाला ठार मारले. येथे मोठ्या मुलाचे मन भरकटत गेले होते. त्याच्या मनात आपल्या लहान भावाबद्दल असुया, द्वेष निर्माण झाला. त्याचे घरातील वागणे, इतरांचे त्याच्याशी वागणे, म्हणजे त्याचे आई, वडिल इतर नातेवाईक, शेजारी या सर्वांचाच संबंध त्याच्या मनाशी येतो.

आईने आधीच मोठ्या मुलाला विश्वासात घेऊन जर विचारले असते तूं एकटाच आहेस तुला तुझ्याबरोबर खेळण्याकरिता आपण एखादा तुला भाऊ किंवा बहीण आणावी का ? तुला तो दादा म्हणेल, तुझ्याबरोबर तो खेळेल, तुझ्याबरोबर शाळेत जाईल, म्हणजेच काय तर त्या मोठ्या मुलाच्या मनाची आधीच तयारी करावयास हवी होती. सहा वर्षांचा मुलगा तसा समजुतदार असतो. मन ही साखळी आहे. या साखळीने जो प्रत्येकाच्या मनाच्या साखळीशी सांधला जातो, तो एकमेकांशी जवळीक निर्माण करतो. पण जो मनरुपी साखळीने सांधलाच गेला नाही तो मुक्त असतो. कधी तो भरकटत जातो, कधी स्वस्थ बसतो, तर कधी खचून जातो. ''जगसे चाहे भागले कोई मन से भाग न पाये ।''

लहान मुलाचे मन, सामान्य माणसाचे मन, संताचे मन किंवा अपराध्याचे मन, कोणतेही मन घेतले तरी त्यात चांगल्या वाईट विचारांचा गोंधळ असतो. येथे आपण एका संताचे आणि प्रजेवर माया करणाऱ्या एका राजाचे मन घेऊ.

चित्रलेखा नावाची एक नर्तकी असते. ती राजाच्या दरबारात नृत्य करीत असते. दिसावयास अतिशय सुंदर असते. तिच्या सौंदर्याचा सुवास राज्यात आणि राज्याबाहेर दरवळलेला असतो. परंतु राजाने आपले मन नर्तकी करिता विचलित होऊ दिले नाही. त्याच राज्यात एक संन्यासी आला. नर्तकीच्या रुपाने त्याचे मन विचलित होऊ लागले. एक दिवस नर्तकी आपल्या सुखाचा त्याग करते आणि संन्यास घेते. आपल्या राज्यातून नर्तकी गेली आपल्या राज्यातल्या एका चांगल्या कलाकाराला आपण मुकलो म्हणून राजा सुद्धा आपल्या सर्व सुखाचा त्याग करतो. येथे राजाचे मन कोणत्याही सुखाचा विचार करीत नाही. सुखाकरिता राजाचे मन जराही विचलित होत नाही. राजाचे मन स्त्री सुखाकरिता आसक्त होत नाही. राजाने आपल्या सर्व इंद्रियांवर काबू ठेवून मन एकदम स्थिर केले. याउलट संन्यासी आपले मन काबूत ठेवू शकला नाही तो नर्तकीच्या प्रेमात पडला. त्याने मन स्थिर राहू शकले नाही.

---

निसर्गावर आरोप करु नका.

मन ही विलक्षण, चैतन्यशील, अत्यंत गुंतागुंतीची गोष्ट आहे. आपले मन जर एखाद्यामध्ये गुंतलेले असेल तर ते स्थिर करण्याकरिता खूप संयम ठेवावा लागतो व मानसिक कष्ट घ्यावे लागतात. अर्जुनाचे मन स्थिर करण्याकरिता भगवान कृष्णाला भगवद्‌गीता सांगावी लागली. मनातूनच पाप-पुण्य, सुख-दुःख यांचा उगम होतो. मनाशी प्रामाणिक राहणे फार महत्त्वाचे आहे. नाहीतर मानसिक रोग उद्‌भवू शकतात. मनांत असंख्य विचारांची गर्दी असते. यातूनच योग्य-अयोग्य मार्गाचा अवलंब केला जातो.

सात-आठ वर्षापूर्वीची गोष्ट. एखाद्याला अयोग्य मार्गाचा अवलंब करण्याकरिता आपणच कसे कारणीभूत होतो ते पहा. एक कुटुंब. नवरा, बायको आणि दोन मुले. मोठा दहावीला, नाव अमर, धाकटा आठव्या वर्गात नाव सागर, तसा संसार मध्यमवर्गीय लोकांसारखा. त्या दोन मुलांची आई नोकरी करीत नव्हती. मोठ्या मुलाचे दहावीचे वर्ष असल्यामुळे ती त्याच्या मागे अभ्यास कर म्हणून सारखी मागे लागत असे. आईच्या कटकटीमुळे अमर आपल्या मित्रांच्या घरी रहाणे, मित्राच्या बरोबर अभ्यास करणे पसंत करीत असे. घरांत रहाणे त्याला विशेष आवडत नसे. झेपेल एवढा अभ्यास तो करीत असे. रात्री मात्र सर्व एकत्र जेवावयास बसत असत. इकडच्या तिकडच्या गप्पा जेवतांना होत असत. आईचे मात्र अमरला मधून मधून टोकणे सुरुच होते. एक दिवस जरा विचित्रच उजाडला. सुटीचा दिवस होता कुटुंबाने रोजचे व्यवहार पार पाडावयास सुरुवात केली. ९ वाजता सर्व एकत्र जेवणास बसले. धाकटा सागर आपल्या मोठ्या भावाला वर्गातील मुलाची गोष्ट सांगत होता. दोघेहि गप्पामध्ये गुंगून गेले होते. तेवढ्यात अमरकडे पाहून आई म्हणाली, ''गप्पा पुरे झाल्यां परीक्षेत हे येणार नाही. आता उठा आणि माझ्यावर उपकार करा, थोडा जरा अभ्यास करा' एका क्षणात अमर जेवता जेवता उठला, हात धुतले आपल्या खोलीत गेला. दार आतून लावून घेतले. तिघांचे जेवण झाले. धाकटा खोलीत जाण्याकरिता म्हणून गेला त्याने दार ढकलले पण ते आतून बंद होते. त्याने अमरला दादा, दादा म्हणून आवाज दिला पण आतून उत्तर आले नाही. बऱ्याच हाका मारुन झाल्या पण दार उघडले गेले नाही. आता मात्र वडिलांचा धीर खचला. त्यांनी शेजाऱ्यांना आवाज दिला.' बघा अमर रागावला आहे तो तुमचे ऐकतो त्याला दार उघडावयास सांगा. शेजाऱ्यांनी बऱ्याच हाका मारल्या परंतु आतून उत्तर आले नाही. शेवटी दार तोडून आत प्रवेश केला. पाहतात तो काय ? एका क्षणांत सर्व संपले होते. अमरने गळफास लावून आत्महत्या केली होती. या ठिकाणी त्या मुलाच्या मनाचा विचार केला तर असे दिसून येते की तो फार हळवा, संवेदनशील असावा. लहान भावासमोर झालेला अपमान पचवू शकला नाही. अमर नाव असून सुद्धा अमरत्व प्राप्त झाले नाही. शेक्सपीअरने म्हटले आहे, 'नावात काय आहे?' ते खरेच आहे. येथे असे म्हणावेसे वाटते की ''हमको मनकी शक्ती देना, मन विजय करें ।''

चैतन्यशील, प्रामाणिक, भाविक, आनंदी, निरागस असे सुद्धा एक मन असते. ते लहान मुलाचे. माझी लहान मुलांची बालवाडी आहे. वय वर्ष अडीच ते साडेतीन वर्षाची मुले बालवाडीत येतात. रोज सकाळी ९ वाजता शाळेत येतात. दोन तासांनी आपल्या घरी जातात. त्यांनी मला कधी जेवतांना बघितले नाही. कधी स्वयंपाक करतांना बघितले नाही. त्यामुळे प्रत्येकाच्या मनांत एक प्रश्नचिन्ह असते. मुले मला आजीअंटी म्हणतात. आपल्या आजीअंटीला घर नाही हा एकच विचार त्यांच्या मनांत असतो. एका मुलाने आपल्या आईला एक दिवशी अगदी कळवळून सांगितले, आमच्या आजीअंटीला घर नाही. ती बिचारी शाळेतच झोपते. आपण तिला आपल्या घरी घेऊन येऊ. येथे त्या मुलांच्या मनाचा निरागसपणा दिसून येतो.

''मनः एव मनुष्याणां काचिदाश्चर्य शृंखला''

---

माणसापेक्षा निसर्गावर जास्त प्रेम करा.

मन ही एक साखळी आहे. या साखळीने जो प्रत्येकाच्या मनाच्या साखळीशी सांधला जातो, तो एकमेकांशी जवळीक निर्माण करतो. संत तुकारामांनी म्हटले आहे ''मना करा रे प्रसन्न सर्व सिद्धीचे कारण।'' आपण संत तुकाराम होऊ शकत नाही; पण प्रयत्न करणे आपल्या हातात आहेत. मुंबई सारख्या मोठ्या शहरात, प्रत्येकाच्या मनावर बराच ताण असतो. अगदी बालवाडीत जाणाऱ्या मुलांपासून तर शंभरी गाठलेल्या वृद्धापर्यंत प्रत्येकाचे मन कोणत्यातरी अनामिक भीतीने ग्रासलेले असते. अशावेळी विचार करावा, मला जो मानसिक आनंद देणारा क्षण आवडेल तो क्षण मी पकडून ठेवीन. कारण मन हे कोळ्याच्या जाळ्याप्रमाणे विणलेले असते. कोळी जसा तंतू जाळे विणतो. तसेच आपले मन अनेक चांगल्या वाईट विचारांनी भरलेले असते. कोळ्याच्या जाळ्याचा एक तंतू तर तो पुन: विणतो. मनाचा तंतू तुटला तर ते जुळवण्याकरिता बरीच वर्षे लागतात. ''ज्याने मन जिंकले त्याने जग जिंकले''

'' मन ही देवता मनही ईश्वर मनसे बडा न कोय''।

आपले मन हे न्यायालय आहे. आपल्या मनाने शिक्षा द्यावयाची ठरवली तर ती आपल्याला फार महागात पडते. माझ्या माहितीतला एक अट्टल गुन्हेगार होता. दिसावयास राजबिंडा, त्याच्या बोलण्यात अदब, वागण्यात शिस्त. बघणाऱ्याला कधीच कळले नसते की तो खुनी आहे. हो, त्याने तीन खून केले होते. माझ्याजवळ प्रांजळपणे कबूल केले होते. तो नेहमी मला म्हणायचा मी दुर्दैवाने गुन्हेगार झालो, परंतु मला माझ्या मुलांना ह्या क्षेत्रापासून दूर ठेवायचे आहे. हा खरा तर त्याच्या मनाने घेतलेला निर्णय होता. म्हणजेच काय तर त्याचे मन त्याला सारखे दोष देत होते. त्याला सुखाची झोप कधी मिळाली नाही. किंवा सुखाने दोन घास खाता आले नाही. त्याच्या मनाने केलेली ही शिक्षाच होती.

मनाच्या खेळाचे अप्रतिम विश्लेषण प.पू. जगद्गुरु श्रीमत् शंकराचार्यांनी केले आहे. ते म्हणतात, ''ढग वायूने आणले जातात, वायूनेच ते दूर केले जातात. तसचे बंध हा मनाने कल्पिला जातो व मोक्ष देखिल मनानेच कल्पिला जातो.''

सौ. अचला महाजन
दूरध्वनी : ५४०८१३८

•••

*With Best Compliments*

*from*

A

WELL

WISHER

*With Best Wishes from*

**Neco Schubert & Salzer Ltd.**

Mumbai

निसर्ग ही देवाची कला आहे.

# भांडण

कुमारी सुगंधा चव्हाण

भांडण किंवा भांडण करता येणे ही एक अशी कला आहे जी कुणालाही सहज विना अभ्यास साधता येते. भांडण करता येण ही बहुतेकांना उपजत देणगी मिळालेली असते. अस्मिता नावाची गोष्ट प्रत्येकाच्या आयुष्यात महत्वाची असते. आपली अस्मिता दुखावल्याचा भास झाला, तशी जाणीव झाली की माणसे भांडू लागतात. भांडण्याची कला मात्र फार थोड्या जणांना अवगत असते. मुळातच भांडणात तरबेज असणारी माणसे कारणाविना सुद्धा लीलया हे कार्य करतात. थोडा धीटपणा, भांडण उकरुन काढणे, चेहऱ्यावरील हावभाव बदलणे, आपला मुद्दा न सोडता तो प्रतिपक्षाच्या मनावर बिंबवणे, आवाज चढवणे, हातवारे करणे, डोळे मोठे करणे त्याचप्रमाणे प्रतिपक्षाच्या वर्मावर घाव घालणं अशा अनेक चाकांनी ही गाडी ते सहज पुढे नेतात. भांडणाची कला अवगत असो वा नसो पण त्याची संधी मिळाली की माणूस तल्लीन पणे भांडू लागतो.

एकमेकांची तत्त्वे जपता जपता स्वतःच्या तत्त्वाला प्राधान्य देण व त्याला धक्का लागेल अशी शंका मनात येताच प्रतिपक्षावर शब्दांचे घाव घातले जातात व आपसूकच भांडणाचा जन्म होतो. भांडणासाठी दोन पक्ष आवश्यक असतात. त्याशिवाय हे कार्य फार कठिण असते. घरातल्या घरात पती-पत्नी, आई-मुलगा, वडील मुलगा, सासू-सून, शेजारी-इत्यादि अशा काही भांडणाच्या क्षेत्रातल्या जोड्या ठरलेल्या असतात काही भांडणाद्वारे आपला राग एकमेकांवर कसा काढता येईल याच गोष्टीच्या शोधात त्या असतात.

किराणामालाच्या दुकानासमोर जिन्नसासाठी लांबलचक रांग लावणे व सर्वांच्या आधी आपल्याला मिळावे म्हणून पुढे जाण्याचा प्रयत्न करताना होणारी भांडणे ही तात्कालिक असतात. चाळीमध्ये, वस्त्यांमध्ये आजूबाजूला, शेजारीपाजारी रहाणारी कुटुंबेदेखील क्षुल्लक कारणावरून एकमेकांशी भांडतात. शाळेत किंवा शेजाऱ्याबरोबर देखील लहान मुलांच्या भांडणात कधी कधी मोठी माणसे लहान होऊन भांडताना दिसतात. मग शेजाऱ्यानी न बोलणे, एकमेकांच्या समोर आल्यावर मान ताठ करून चालणे, चालताना मुद्दाम धक्का मारणे किंवा पुढे जाण्यासाठी वाट न देणे अशा अस्त्रांनी एकमेकांवर राग काढला जातो. परंतु हल्ली शहरी कारणामुळे म्हणा किंवा इमारतींची संख्या वाढल्यामुळे माणूस एकलकोंडा झाला आहे त्यामुळे हे भांडणाचे प्रमाण कमी झाले आहे.

शाळा महाविद्यालयात देखील कॉलेज विद्यार्थी-विद्यार्थिनी साध्या बसण्याच्या जागेवरून भांडताना दिसतात. पहिल्या बाकावर पुढे बसण्याचा अट्टाहास केल्यामुळे व ती इच्छा पुरी न झाल्यामुळे एकमेकांवर राग काढला जातो व त्याचे रुपांतर भांडणात होते.

भातुकलीचा खेळ खेळणारी लहान मुले देखील भांडतात. पण त्यांची भांडणे तात्कालिक असतात. थोड्यावेळाने ही भांडणे विसरुन ती चिमुरडी मुले परत एकत्र येतात. मोठी माणसे मात्र याला अपवाद ठरतात. राजीखुषीने, पसंतीने, एकमेकांच्या गळ्यात हार घालुन संसार नाट्यात सामील होणाऱ्या पतीपत्नीचा सहवास तर आयुष्यभराचा असतो. दोन व्यक्तींचा सहवास जेवढा जास्त तेवढ्या त्यांना भांडण्याच्या अधिक संधी मिळतात. एवढ्या प्रदीर्घ काळात भांड्याला भांड लागणारच त्यामुळे कधी गैरसमज कधी अविश्वास तर कधी अस्मिता दुखावली जाण अशा अनेक कारणांमुळे भांडण घडून येतात. या भांडणामध्ये

विरोधी पक्षांना प्रोत्साहन देणारे मित्र वा नातेवाईक नामक जमात प्रभावी असेल तर अशी भांडणे मोठ्या उत्साहाने खेळली जातात. संसाराचे क्षेत्र व्यापक असल्यामुळे दुधाच बील देण्यापासून ते एखादी वस्तू विकत घेण्यापर्यंत असंख्य गोष्टी त्यात येतात त्यामुळे मतभेदांना वावही तेवढाच भरपूर मिळतो. पाहुणे हा देखील भांडणाचा ज्वलंत विषय आहे त्यात माहेरची माणस व सासरची माणसे अशा भेद असल्यामुळे बरेच मतभेद निर्माण होतात.

घरगुती भांडणामध्ये अश्रुपात, अबोला, भांड्यांची आदळआपट, स्वयंपाक न करणे, इतकेच काय पण प्रश्न फार तात्विक असेल तर माहेरी निघून जाण अशी अस्त्र वापरुन "सौ" कडून "श्री" पक्षाला त्रास देण्याचा प्रयत्न केला जातो. यात "श्री" मंडळीसुद्धा बाहेर जेवायला जाण, वर्तमानपत्र डोळ्यासमोर धरुन बसणं, झोपी जाणं, मुलांवर ओरडण इत्यादी अस्त्रांनी "सौ" ला प्रत्युत्तर देऊ पाहतात.

संसार म्हटला की भांड्याला भांड लागणारच पण अशी भांडी फार आवाज करणार नाहीत याची दक्षता दोघांनीही घ्यायला हवी. कधी कधी भांडणानंतरचे रुसवे-फुगवे घालविण्यासाठी एखादे गीत म्हंटले जाते. या भांडणावरच आधारित एक मराठी चित्रपट गीत

श्री. :- बोलणार कधी?

सौ. :- बोलणार नाही.

श्री. :- हसणार कधी?

सौ. :- हसणार नाही.

भांडणसंपल्यानंतरची पुढची हलकी फुलकी भावना प्रकट करते.

भांडणाची कितीही खुमखुमी, आवड असली तरी शेवटी कुठल्यातरी एका पक्षाला आवरत घ्याव लागत. त्यामागे समंजसपणा असो किंवा आणि कुठलेही कारण असो पण भांडण आवरत घेतल नाही तर ते चिघळण्याचा संभव जास्त असतो. भांडण जोपर्यंत तात्कालिक असतात तोपर्यंत ठीक असतात ती ठराविक मर्यादेबाहेर जाऊ लागली तर उग्र रुप धारण करतात.

या भांडणामुळे अनेक संसार उध्वस्त झाल्याचे बरेच दाखले इतिहासात आपल्याला मिळतील. तरीही पुढचा मागचा विचार न करता आपण भांडतो. म्हणून पतीपत्नीने रात गई बात गई अशा न्यायाने हे वाद विसरुन पुन्हा हसत खेळत संसार नाट्य सुरु ठेवावे.

सुगंधा चव्हाण
वि.प्र. मंडळ कार्यालय, नौपाडा, ठाणे.
दूरध्वनी : ५४२ ६२७०

•••

*With Best Compliments*

*from*

A
WELL
WISHER

# सोव्हिएत रशियाचा साक्षेपी इतिहास

प्रा. मोहन पाठक

'सोव्हिएत साम्राज्याचा उदय आणि अस्त' या अभ्यासपूर्ण ग्रंथाच्या नावातून सूचित झाल्याप्रमाणे इतिहास हेच प्रमुख सूत्र या ग्रंथाचे लेखक विख्यात पत्रकार व संपादक श्री. गोविंदराव तळवलकरांनी मनाशी बाळगले आहे.व्यासंग, अभ्यास असणारी गोविंदरावांसारखी अभ्यासक मंडळी वाचता वाचता आपणहून आपला अभ्यास ग्रंथनिदिष्ट करून ठेवतील याची शक्यता कमीच. गोविंदरावांच्या अन्य ग्रंथाप्रमाणेच कोणीतरी सुचवून त्यांचा हा अभ्यास ग्रंथरूपात मांडला गेला. सदर ग्रंथाच्या प्रास्ताविकात स्वतः गोविंदराव तळवलकरांनीच हे सांगितले आहे[ (या प्रकारचा इतिहास लिहावा ही कल्पना श्री. श्री. पु. भागवतांची (पृ. १०)] या ग्रंथाचा हा पहिला खंड आहे. यात पंधरा प्रकरणे असून प्रकरणांतील विवेचनाची व्याप्ती सुरुवातीच्या कालखंडापासून ते लेनिनच्या अंतापर्यंतच्या कालखंडापर्यंत आहे.

इतिहास लिहिताना लागणारी तटस्थता या ग्रंथात आहे. मूक इतिहास या पहिल्याच प्रकरणात गोविंदराव लिहितात, ''भूगोलाचा समाजावर परिणाम होत असतो. भूगोलाने इतिहास बदलतो, तसाच इतिहासाने भूगोल बदलतो.'' (पृ.१) या प्रकरणात स्लाव्ह लोकांच्या (नववे शतक) कालखंडापासून लेखकाने शोध घेण्यास प्रारंभ केला आहे. या प्रारंभिक कालखंडातील अनेक स्थित्यंतरे, त्यांचा रशियन संस्कृतीवर झालेला मूलगामी परिणाम यांचे इत्थंभूत वर्णन केले आहे. उदा. किएव व मॉस्को या प्रकरणात क्रिस या इतिहासकाराचा दाखला देत रशियनांनी क्रूरतेची परिसीमा कशी गाठली, तातार लोकांच्या वर्चस्वाचे कोणते परिणाम रशियनांना भोगावे लागले त्याचे तपशील आले आहेत. नेपोलियनच्या पराभवानंतरही स्वास्थ्य निर्माण झाले नाही अशा देशांत रशिया होता. या पार्श्वभूमीवर जगभर अनेक उलथापालथी झाल्या. फ्रेंच राज्यक्रांती, इटलीतील असंतोष, श्रम विभागणीचे तत्त्व मांडणाऱ्या ॲडम स्मिथची विचारसरणी, ब्रिटनमधील औद्योगिक क्रांती, यातून जगभरच अनेक प्रश्न निर्माण होत राहिले, त्यांची उत्तरे शोधण्याचे सफल असफल प्रयत्न होत राहिले. समाजवाद, शास्त्रीय समाजवाद व हेगेल, मार्क्स, एंजल्स असे विचारवंत या सर्व पार्श्वभूमीवर रशियन राष्ट्रवादाची बीजे रोवली गेली. मार्क्सला आपल्या हयातीतच आपली भाकिते खरी ठरत नसल्याचे दिसून आले.

हा सर्व इतिहास अतिशय तपशीलात, तटस्थपणे व तरीही रुक्ष न होऊ देता गोविंदरावांनी लिहिला आहे. झारशाहीचा अंत होऊन अखेरीस १९१७ साली झालेल्या क्रांतीपर्यंतचा मोठा कलिक टप्पा या ग्रंथात येतो. या नंतरच्या दोन प्रकरणात (१४ व १५) लेनिनच्या कालखंडातील इतिहासाचे तपशीलवार वर्णन येते. स्वतः संपादन क्षेत्रातील असल्यामुळे वर्णनातील अचूकता, पाल्हाळ न लावता, मुद्देसूद लिहिण्याची सवय यामुळे पुस्तक अतिशय चांगले झाले आहे.

गोविंदरावांना साहित्याबद्दल जी ओढ आहे त्यातून 'रशियन साहित्यातील सुवर्णयुग' या प्रकरणात त्यांनी सुवर्ण युगातील (१९ वे शतक) साहित्य विश्वाचा सुंदर इतिहास सादर केला आहे. पुश्किन, डोस्टोवस्कीकी, टॉलस्टॉय, तुर्गेनिव, रॅडिश्चेव इ. अनेकांच्या साहित्यिक योगदानाचा आढावा या प्रकरणात स्वतंत्रपणे घेतला आहे.

अभ्यासपूर्ण, संशोधनातून सिद्ध झालेला असा हा ग्रंथ असल्याने पदोपदी अनेक इतिहासकारांचे दाखले लेखकाने दिले आहेत. प्रत्येक प्रकरणाच्या शेवटी असणारी संदर्भ सूची, ग्रंथाच्या अखेरीस असणारी निर्देश सूची यामुळे अभ्यासकांच्या दृष्टीने ग्रंथाची उपयुक्तता कितीतरी वाढली आहे.

(पान क्रमांक ३१वर)

# चुकते कोठे ?

सौ. सविता केळकर

*पालक विद्यार्थी संबंधातील असंख्य प्रश्न संवेदनशील शिक्षकाला अस्वस्थ करतात. केळकर बाईंच्या अनुभवातले काही प्रश्न त्यांनी या लेखात व्यक्त केले आहेत. उत्तरे ज्याची त्यानी शोधावी- संपादक*

शाळेत रानडे वक्तृत्व स्पर्धेचे परिपत्रक आले. विद्यार्थिनींची नावे पाठविण्याची शेवटची तारीख उजाडली होती आणि त्याच दिवशी परिपत्रक हातात आले. आता विद्यार्थिनींची नावे घेऊन एक विनवणी पत्र. माझे पत्रही लिहून झाले. फक्त विद्यार्थिनींची नावे घालणे बाकी होते कारण नावे आली नव्हती. संबंधित शिक्षकांना बोलावून चौकशी केली तर चार-पाच विद्यार्थिनींना निवडले होते परंतु कोणीही स्पर्धेला जायला तयारच नव्हत्या.

दोन दिवसांनी वीना आणि तिची आई सकाळीच माझ्या खोलीत हजर. आईची वीनाला घेऊन पुण्याला जाण्याची तयारी होती पण वीनाच तयार नव्हती. अगदी रडकुंडीला आली होती. खरे तर वक्तृत्व स्पर्धेत भाग घेणे वीनाला काही नवीन नव्हते. पण का कोण जाणे ह्या वेळी ती जायला तयार नव्हती.

'अग वीना, तुझी अडचण काय ते सांग पाहू'' माझा प्रश्न. बराच वेळ ती गप्पच . बरेच खोदून खोदून विचारल्यावर म्हणली,' बाई, चाचणी परीक्षा जवळ आली आहे. संस्कृत स्कॉलरशिपला बसायच आहे, त्याचे पाठांतर करायचे आहे, सावरकर वक्तृत्व स्पर्धेत भाग घ्यायचे म्हणतात सगळे. मी कशा - कशाची तयारी करु ? परीक्षेत मार्क कमी पडुन नंबर खाली गेला तर ?''

मी तिच्या आईच्या चेहऱ्यावरचे भाव न्याहाळत होते. कदाचित आता ही सुद्धा म्हणेल, 'हो बाई, हे मात्र खरं हं ! परीक्षेत मार्क कमी पडुन ती स्पर्धेत मागे राहिली तर ?'' पण आईचा पूर्ण निर्धार झालेला की वीनाने वक्तृत्व स्पर्धेत भाग घ्यावा. '' अग पडू देत कमी मार्क दोन-चार टक्के कमी पडले तर चालेल मला. मी काहीही बोलणार नाही तुला, तुला जमेल तसा अभ्यास कर तू. शिवाय वक्तृत्व स्पर्धेतही बक्षीस मिळालेच पाहिजे असे नाही एक अनुभव तर मिळेल तुला. तुझे स्वतःचे वाचन होईल. इतरांचे विचार तुला ऐकायला मिळतील हा काय कमी फायदा आहे?''

'' बघ वीना, अग किती भाग्यवान आहेस तू !'' माझ्या तोंडून चटकन प्रतिक्रिया उमटली. ''अग, पालक विद्यार्थ्यांना उलट सांगतात-'एवढे टक्के मिळालेच पाहिजेत', नाहीतर काहीही धाक दाखवतात. शिक्षा करतात. तुझी आई तुला समजून घेत आहे तर तू तयार होच.''

शेवटी बरीच समजूत घातल्यानंतर वीना तयार झाली वक्तृत्व स्पर्धेत भाग घ्यायला.

दिवसभर मला वीनाची आई आठवत होती. खरच अस सर्वच पालकांनी समजुन घेतल तर ! पाचवीपासून काही काही पालक मार्क जास्त मिळविण्यावर भर देतात आणि स्वतःच आपल्या पाल्यांच नुकसान करतात अस वाटतं. कुठल्याही स्पर्धेत भाग घेऊ न देणं, खेळायलाही अगदी ठरावीक वेळीच पाठविणं, ५वी पासूनच क्लासेसला घालणं, त्यांचं बालपणच हरवून गेल्यासारखं वाटतं. 'एवढे मार्क मिळालेच पाहिजेत ' ह्या विचाराने तर, जर तेवढी कुवत नसलेला विद्यार्थी मार्क मिळवू शकला नाही तर , जर भीतीने तो नको तो मार्ग अनुसरतो. खोटे बोलणे, प्रगतिपुस्तक आणायला सांगितले की मार्क स्वतःच वाढविणे, पालकांची सही स्वतःच करणे इ. आणि मग ती सवयच होऊन जाते.

एकदा तर पेपरात स्वतःच गुण वाढविलेल्या विद्यार्थिनीच्या आईला अनेकदा बोलावल्यानंतर ती शाळेत आली. पेपरमध्ये आपल्या मुलीने मार्क स्वतः वाढविले आहेत हे कळल्यावर तर रडायला लागली. मग तिची प्रतिक्रिया अशी, '' काय करणार हो बाई ? घाबरली असेल. तिचे वडील इतके कडक आहेत की मार्क कमी पडले तर मारले असते. म्हणून तिने दोन मार्क वाढविले असतील''

''पण, आई म्हणून तुम्ही तिला विश्वासात घ्या. असा खोटेपणा करणे कसे वाईट आहे हे तिला समजावून सांगा. आणि महत्त्वाचे म्हणजे तिची कुवत काय आहे ते तिच्या वडिलांना समजावून सांगा. कोणाशीही तिची तुलना करु नका. तिच्या कुवतीप्रमाणे तिला मार्क मिळवू दे. तिला हवे असेल ते चांगले क्षेत्र निवडू दे. तिच्या आवडीचं ते क्षेत्र असले की ती त्यात नक्की चमकेल व यशस्वी होईल'' माझे स्पष्टीकरण.

'' बाई, प्लीज तुम्हीच सांगाल का ? माझे पण ते काहीच ऐकत नाहीत ?'' ('कुठे आहे ती स्त्री-पुरुष समानता ?' माझ्या मनातील विचार)

शेवटी वडिलांना बोलावले. सर्व समजावून सांगितले. त्यांचं आपलं एकच म्हणण. ''बाई मार्क कमी मिळवून कसं चालेल? माझ्या भावाची मुले एक डॉक्टर, एक इंजिनियर. कधीही फर्स्ट क्लास सोडला नाही. ही जर नीट शिकली नाही तर काय म्हणतील आजूबाजूचे लोक आम्हाला ?

मुलीचे मार्क जास्त मिळविणे हे त्यांच्या 'प्रेस्टीज' साठी होत. तिच्या प्रगतीच्या किंवा व्यक्तिमत्त्व विकासासाठी नव्हेत. लोकांनी ह्यांना काही बोलायला नको, समाजात ह्यांना खाली बघायला नको म्हणून तिला मार्क चांगले हवे होते. अशा वेळी पालक आपल्या मुलाची किंवा मुलीची कुवत किती आहे हे मान्य करायला तयार नसतात.

मी गप्पच बसले. ह्या पार्श्वभूमीवरतर चंदूची आई मला फारच परिस्थितीचा विचार करुन वागणारी वाटली. परीक्षेचा निकाल लागल्यावर मला भेटायला आली व मला म्हणाली, '' बाई चंदू जरा डोक्याने कमी आहे हे लक्षात आलयं आमच्या. दोन विषयात तो नापास आहे. फक्त काठावर का होईना, पास होण्यापुरते मार्क त्याला मिळावेत अस वाटत. कसा घेऊ मी त्याचा अभ्यास ?''

**सौ. सविता विनय केळकर**
उपमुख्याध्यापिका,
डॉ. बेडेकर विद्या मंदिर, ठाणे.
दूरध्वनी : ५४२१७७६ (शाळा)

•••

(पान क्रमांक २९वरुन)

**सोव्हिएत रशियाचा साक्षेपी इतिहास**

उपसंहारात त्यांनी क्रांतीच्या विनाशाचा निर्देश केला आहे. अपरिपक्व भांडवलदारीतून हुकूमशाहीकडे १९१७ पासून सुरू झालेल्या रशियन वाटचालीचा आढावा घेऊन साम्राज्याच्या उदयापर्यंतचा हा इतिहास बहुधा पुढील खंडात अस्तापर्यंतच्या चित्राची मीमांसा करील.

रशिया, रशियन लोक जीवन, कम्युनिझमचा आपल्याकडील लोकांवर असलेला परिणाम अशा अनेक संदर्भातून या विषयाचे भारतीय, विशेषतः मराठी अभ्यासकांच्या दृष्टीने असणारे मोल महत्त्वाचे आहे. इतिहास व राजशास्त्राच्या विद्यार्थ्यांनी, अध्यापकांनी मुद्दाम वाचलाच पाहिजे असा हा ग्रंथ आहे.

**प्रा. मोहन पाठक**, ग्रंथपाल
बांदोडकर विज्ञान महाविद्यालय, ठाणे.

पुस्तक - **सोव्हिएत साम्राज्याचा उदय आणि अस्त**
लेखक - **गोविंद तळवळकर**
प्रकाशक - मौज प्रकाशन, मुंबई
प्रकाशन वर्ष - १९९८ पृष्ठे ६३
मूल्य - **रूपये ३२५/- पृष्ठे १२,४४३**

•••

निसर्ग जरी लपलेला असला तरी तो आपल्यावर मात करतो.

# उपक्रमांच्या गर्दीचे दिवस

विशाखा देशपांडे


फ्रेंडशिप डे, रोझ डे, रिबन डे, टाय डे हे असे सगळे वेगवेगळे १२ महिन्यां पैकी सहा-आठ महिने तरी हल्ली हल्ली महाविद्यालयांमधे विविध प्रकारे साजरे केले जातात. अगदी अलिकडेच ते काही शाळांमधेही साजरे होताना दिसतात. या सगळ्या डेज मधे आता मदर्स डे ची ही भर पडली आहे. पण हे सगळे डेज साजरे करत असताना 'टीचर्स डे' किंवा गुरु पौर्णिमा हा दिवस महाविद्यालयामधे साजरा केला जातोका हे जर बघायला गेलो तर त्याचं उत्तर निराशजनकच असेल. हं! शाळांमधे तो विविध प्रकारे साजरा केला जातो. परंतु महाविद्यालयीन तरूण पिढीमधे हा दिवस साजरा करावा, किंवा शिक्षकांच्या प्रति आपली काही नैतिक बांधिलकी आहे, त्याची जाणिव फार थोड्या विद्यार्थ्यांना असते. तेव्हा फारशा महाविद्यालयांतील विद्यार्थी या 'डे' ची दखल घेत असतील असे वाटत नाही. पण वास्तवाला दखल सुद्धा अपवाद असतात. तेव्हा पुढील काही संदर्भ वाचल्या नंतर पूर्ण पणे निराश होण्याची पाळी येणार नाही.

अत्यंत तणावपूर्ण परिस्थितीत, संवेदनशील व वेभरवशाच्या वातावरणात निवडणुका पार पडल्यात. काही ठिकाणच्या हिंसक घटना वगळता, मतदानाची टक्केवारी जरी कमी असली तरी बऱ्याच ठिकाणी शांतता पूर्ण मतदान झाले. काही ठिकाणी घडलेल्या घटना, मनामधे अस्वस्थता निर्माण करतात आणि मग वाटायला लागतं की या लोकशाहीची लोकांना गरज आहे की नाही ? विहारमधे मोठ्या प्रमाणात झालेली पोलिसांची प्राणहानी, साताऱ्यात पडलेली हत्या, या सगळ्याचा विचार केला की वाटतं कशावर विसंबून रहायचं ? तलवारी घेऊन फिरणाऱ्या नेत्यांनी आम्हाला निवडून द्यावं अशी अपेक्षा करावी ! या सगळ्या परिस्थितीत या देशाचा विकास नक्की होणार की नाही ?

असो, या सगळ्याच्या पार्श्वभूमीवर विघ्नहर्त्या गणरायाचे सुखा समाधानाने आणि धामधुमीत आगमन झालं. सुखकर्त्या, सर्वमंगल गणरायाचे आशीर्वाद सर्वत्र पसरलेले असताना लक्ष लक्ष ज्ञानदीप उजळून त्या भाग्यविधात्याने आमचा परिसर कसा उत्साहाने फुलवून टाकलाय ते सारं काही -

**सौ. आनंदीबाई केशव जोशी इंग्लिश मि. स्कू. पूर्व प्राथमिक विभाग :**

दिनांक २५ जुलै रोजी शाळेच्या वेळात 'रक्षाबंधन' साजरे करण्यात आले. या वेळी मुलींनी वर्गातील मुलांना राख्या बांधल्या व सर्व मुलांना चॉकलेटस् देण्यात आली.



**सौ. ए.के. जोशी इंग्लिश मिडियम स्कूल. छोट्या बाळगोपाळांचा 'गोविंदा' कृष्ण झाला होता अद्वैत रणदिवे व राधा झाली होती हेतल पगदर.**

दिनांक २ सप्टेंबरला दही 'हंडी' साजरी केली गेली. या वेळी एका मुलाला कृष्ण बनवून पारंपारिक पद्धतीने

---

निसर्गाला तुमचा शिक्षक बनवा. निसर्ग जरी लपलेला असला तरी तो आपल्यावर मात करतो.

'गोविंदा' खेळून हंडी फोडण्यात आली. त्यानंतर सर्वांना प्रसाद म्हणून दहीकाला वाटण्यात आला.



सौ. ए.के. जोशी इंग्लिश मिडियम स्कूल. मोठ्या शिशूची 'दही हंडी'.

**सौ. आनंदीबाई केशव जोशी इंग्लिश मि. स्कू. पूर्व माध्यमिक विभाग :**

कु. शीतल हळदवणेकर ९वी अ हिने दिलेल्या माहिती नुसार -


खरंतर देवाने माणसाला आनंदी राहण्याची क्षमता दिली आहे. पण, या धकाधकीच्या आयुष्यात माणसाला मानसिक ताण-तणाव, अपयशाची धास्ती, दडपण या सर्वांशी सामना करावा लागतो. अशामध्ये आपल काम आपण चांगल्या प्रकारे करु शकत नाही. आज एकेका मार्कासाठी जिथे प्रचंड स्पर्धा आहे तिथे मन एकाग्र विद्यार्थी अभ्यास करू शकत नाही. म्हणूनच मन स्थिर ठेवून मुलांनी अभ्यास कसा करावा, याचा कानमंत्र योगाचार्य श्री. श्रीकृष्ण व्यवहारे यांचे दिनांक ६ सप्टेंबर ते १० सप्टेंबर या काळात 'मेधा संस्कार' मालिकेमधे मार्गदर्शनपर व्याख्याने झाली. त्यांच्या बरोबर सौ. सुजाता भिडे व सौ. माधवी आळवणी यांनी मुलांना अनमोल मार्गदर्शन केले.

शाळेच्या इ. ५वी व ६वी च्या सुमारे ३६० विद्यार्थ्यांनी दिनांक १६/९/९९ ते २२/९/९९ रोजी सहस्त्रावर्तन केली. याचे संचालन सौ. वीणा जोशी व हिंदू जागृती मंडळ यांनी केले.


गेल्या महिना भरातील बातम्यांचा वेध-

**डॉ. बेडेकर विद्या मंदिर (प्रा. वि.)**

महाराष्ट्र राज्यमान्य खासगी प्राथमिक शिक्षक / शिक्षकेतर महासंघातर्फे एका अभिनव चित्रकला स्पर्धेच आयोजन करण्यात आलेहोते. कारगिल युद्धाच्या पार्श्वभूमीवर विषय देण्यात आले होते. ठाण्यातील सर्व प्राथमिक शाळांनी स्पर्धेत भाग घेतला होता. या स्पर्धेत आपल्या शाळेतील इ.४थी च्या विद्यार्थ्यांनी भाग घेतला. त्यात **कुमारी अनुराधा गिरीश ओगले** हिस प्रथम पारितोपिक व रोख रु. ५०१/- व **कुमारी अनुश्री प्रकाश गोडबोले** हिस उत्तेजनार्थ रु. १०१/- चे पारितोपिक मिळाले.



कु. अनुराधा ओगले



कु.अनुश्री गोडबोले

तसेच 'कुमार कला केंद्रातर्फे' घेण्यात येणाऱ्या विविध स्पर्धातून इ. १ली ते ४थी च्या अनेक विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता. यामध्ये रेकॉर्ड डान्स स्पर्धेत कुमारी अक्षदा रमेश सोंडकर हिस प्रथम क्रमांकाचे पारितोपिक मिळाले. तसेच वक्तृत्व स्पर्धेत कुमारी स्नेहा दिलीप काळे हिस तृतीय क्रमांकाचे पारितोपिक मिळाले.

निसर्गाला तुमचा शिक्षक बनवा.

प्राथमिक विभागात ऑगस्ट महिन्यात विविध सांस्कृतिक कार्यक्रम साजरे केले. २ ऑगस्ट रोजी बालसभा घेऊन 'लोकमान्य टिळक पुण्यतिथी' साजरी केली. यामध्ये विद्यार्थ्यांनी लोकमान्य टिळकांच्या कार्यावर भाषणे केली. ९ ऑगस्ट रोजी 'ऑगस्ट क्रांती दिन' साजरा केला. विद्यार्थ्यांना साने गुरुजींच्या जीवनावर आधारित चित्रपट दाखविला गेला. तसचे 'दिपपूजा', 'नागपंचमी' व 'रक्षाबंधन' हे सण साजरे केले. यामध्ये प्राथमिक विभागाच्या सर्व विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. 'रक्षाबंधन' सणाच्या दिवशी विद्यार्थ्यांना राख्या बांधल्या व गोळ्या वाटल्या.

श्रावण महिन्यात 'श्रावणी सोमवार' साजरे केले. तसेच 'श्रावणी शुक्रवार' साजरा केला. या दिवशी विद्यार्थ्यांना चणे व लाडू याचे वाटप केले. श्रावण महिन्यातील विविध सणांचे महत्त्व विद्यार्थ्यांना वेळोवेळी सांगण्यात आले.

**डॉ. बेडेकर विद्या मंदिर (मा.वि.) - शालेय वृत्तांत :**

कुमार कला केंद्रातर्फे घेण्यात आलेल्या आंतरशालेय विविध गुणदर्शन स्पर्धेत- एकपात्री अभिनयाचे प्रथम पारितोषिक कु. नीता फाटक (९अ), वक्तृत्व स्पर्धेत प्रथम पारितोषिक कु. दीपाली पाटील (५अ) व गीत गायन स्पर्धेत प्रथम पारितोषिक कु. प्राजक्ता काळे (९ब) यांना प्राप्त झाले.

विवेकानंद केंद्रातर्फे घेतल्या गेलेल्या उतारा पाठांतर स्पर्धेत पुढील विद्यार्थ्यांना पारितोषिके प्राप्त झाली.

१) कादंबरी शेंडे (५अ) २) सायली श्रोत्री (५अ)
३) अनुजा नामजोशी (७अ) ४) सिद्धिका वैसास (७अ)
५) रेश्मा चिटणीस (७अ)

या स्पर्धेसाठी सौ. मीरा लिमये व कु. सुचिता वाळंज यांनी मार्गदर्शक म्हणून काम केले.

सालाबादप्रमाणे याहीवर्षी इ.९वी अ ब ९ वी क च्या विद्यार्थिनी वेऊर येथे रक्षाबंधन निमित्त गेल्या होत्या. तेथील आदिवासी विद्यार्थ्यांना त्यांच्या गरजे नुसार वाटल्या व मग्ज हे या विद्यार्थिनींनी भेट म्हणून दिले. या कार्यक्रमासाठी मुख्याध्यापक श्री. अ.वि. सहस्रबुद्धे, माजी शिक्षक श्री. प्र.ग. वैद्य, श्री. सोनवणे, श्री. प्र.बा. कुलकर्णी, सौ. मीरा लिमये, सौ. ज्योती सोमण, सौ. अर्पणा भट हे शिक्षक उपस्थित होते.

२७ ऑगस्ट ९९ रोजी कॅमल कलर स्पर्धा घेण्यात आली. यात इ. ५वी ते १०वी चे सर्व विद्यार्थी सहभागी झाले होते.

गणित अध्यापक मंडळातर्फे घेण्यात आलेल्या गणित संबोध परीक्षेत इ. ५वी त कु. सायली संजीव श्रोत्री (५अ) ही ९८ गुण मिळवून प्रथम आली. तिला सौ. झंझाड यांचे मार्गदर्शन लाभले. इ. ८वी तील अमेय जोशी व सुयोग मपारा यांना १०० पैकी १०० गुण प्राप्त झाले. त्यांना सौ. वंदना अडसुळे व सौ. अंजली पंडित यांचे मार्गदर्शन लाभले.

शाळेतील विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या भित्तीपत्रिका व हस्तलिखितांचे प्रकाशन दि. २८ ऑगस्ट ९९ रोजी प्रा. मोहन पाठक यांच्या हस्ते झाले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक श्री. सहस्रबुद्धे यांनी केले. पाहुण्यांची ओळख सौ. मंजिरी दांडेकर यांनी करून दिली. सूत्रसंचालन सौ. सोमण यांचे तर आभार प्रदर्शन श्री. प्र.बा. कुलकर्णी यांनी केले. आपल्या भाषणात प्रा. पाठकांनी सांगितले की या हस्तलिखितातूनच लेखक जन्माला येतो. हस्तलिखित हा आपल्या जडणघडणीतला एक अविभाज्य भाग आहे. ग्रंथासारखा दुसरा मित्र नाही. स्वतःचे विचार कसे मांडावे हे हस्तलिखित शिकवते. वाचनशून्य माणूस म्हणजे पशुतुल्य माणूस. भरपूर वाचा कारण वाचाल तर वाचाल. असा मोलाचा संदेशही त्यांना जाता जाता दिला.

---

निसर्गानेच आपल्याला बनवले आहे.

शिक्षक पालक संघाची १९९९-२००० या शालेय वर्षातील पहिली सभा २८ ऑगस्ट ९९ रोजी झाली. या सभेला सर्व शिक्षक उपस्थित होते व निमंत्रितां पैकी २८ पालक प्रतिनिधी उपस्थित होते. या सभेत कार्यकारिणी नेमली गेली. सभेत सौ. देव (१०वी), श्री. पाखरे (५वी), सौ.फडणीस (८वी) इ. पालकांनी त्यांची मते मांडली. शिक्षकांतर्फे उपमुख्या. सौ. केळकर, पर्यवेक्षिका सौ. चौवळ, कलाशिक्षिका सौ. दांडेकर, श्रीम. आशा जोशी, श्री. प्र.बा. कुलकर्णी इ. शिक्षकांनी आपल्या सूचना व विचार पालकांसमोर समर्थपणे मांडले.

ब्राह्मण सेवा संघातर्फे दिल्या जाणाऱ्या पुरस्कारासाठी आपल्या शाळेतील श्री.प्र.बा. कुलकर्णी यांची निवड झाली. कविवर्य श्री. शंकर वैद्य यांच्या हस्ते त्यांना सन्मानित करण्यात आले.

तसेच आपल्या शाळेतील कलाशिक्षिका सौ. मंजिरी दांडेकर यांचा त्यांच्या शैक्षणिक कार्यावद्दल रोटरी क्लब ऑफ ठाणे तर्फे सत्कार करण्यात आला. माजी शिक्षक आमदार मा. वसंत बापट यांच्या हस्ते त्यांना सन्मानित करण्यात आले.

आपल्या शाळेतील विद्यार्थिनी कु. अनघा नंदकुमार मराठे ही माध्यमिक शालांत परीक्षा-मार्च ९९च्या गुणवत्ता यादीत २१व्या क्रमांकावर चमकली. या परीक्षेतील फेर गुणतपासणीत इंग्रजी व संस्कृत मिळून १०गुण वाढल्यामुळे तिला हा मान प्राप्त झाला. तिच्या या यशावद्दल शिक्षक, शिक्षकेतर, विद्यार्थी व मंडळाचे पदाधिकारी यांजकडून हार्दिक अभिनंदन.

सालाबादप्रमाणे यंदाही शालेय गणेशोत्सव १३ व १४ सप्टेंबर ९९ रोजी उत्साहात साजरा करण्यात आला. आजच्या या निवडणुकीच्या काळात 'नेता कसा असावा' याचे उद्बोधक मार्गदर्शन करणारी आरास सौ. ए.के. जोशी इं. माध्यमाच्या शाळेने केली होती. श्रींचे आगमन व विसर्जन डॉ. बेडेकर विद्या मंदिर (मा.वि.) येथील इ.८वी व ९वीच्या विद्यार्थ्यांनी लेझिमच्या तालबद्ध नृत्यावर केले.

सालाबादप्रमाणे ५ सप्टेंबर ९९ रोजी शिक्षक दिन डॉ. बेडेकर विद्या मंदिर व सौ. ए.के. जोशी स्कूल तर्फे साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी बालशिक्षण परिषदेचे अध्यक्ष श्री. रमेश पानसे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. याच कार्यक्रमात डॉ. बेडेकर विद्या मंदिर (मा.वि.) मधे २०वर्षे सेवा झाल्यावद्दल सौ. उषा कळमकर व सौ. अंजली पंडित यांचा व सौ. ए.के.जोशी इं.मि. स्कूल येथे १०वर्षे सेवा झाल्यावद्दल सौ. मेधा लाड यांचा प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यंदाचा कै. सुमतीबाई टिळ्ळू 'आदर्श शिक्षक' पुरस्कार रु.५०१/- डॉ. बेडेकर विद्या मंदिरच्या उपमुख्याध्यापिका सौ. सविता केळकर यांना जाहीर करण्यात आला. यावद्दलची कृतज्ञता व्यक्त करताना सौ. केळकर यांनी शिक्षक व पदाधिकाऱ्यांच्या परस्परांशी असलेल्या मोकळ्या नात्याचा व वातावरणाचा उल्लेख केला. तसेच पदाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाचा लाभ यापुढेही असाच लाभत राहो अशी इच्छा प्रदर्शित केली.




'शिक्षक दिन' समारंभ - महाराष्ट्र बालशिक्षण समितीचे अध्यक्ष प्रा. रमेश पानसे शिक्षकांशी हितगुज करताना.

आपल्या भाषणात श्री. रमेश पानसे यांनी सांगितले की आज खरे पाहता विद्यार्थ्यांपेक्षा पालकांनाच शिक्षण देण्याची खरी गरज आहे. पालकांच्या अनाठायी

लिखाण, वाचन हे निसर्गातूनच येते.

महत्त्वाकांक्षेमुळे विद्यार्थ्यांचे बालपण हरवत आहे. याच अनुषंगाने त्यांनी सुरु केलेल्या आनंददायी शिक्षण देणाऱ्या शाळेबद्दलही त्यांनी सांगितले. तसेच मुलांना शिकवताना समता व ममता या दोन धोरणांचा अवलंब करा असा मोलाचा सल्लाही जाताजाता त्यांनी दिला.

ज्या शिक्षकांची शालेय सेवा २५ वर्षे व त्यापेक्षा जास्त झाली आहे अशा शिक्षकांना 'सुमन मोटेल्स' तर्फे प्रशस्तीपत्रक व रौप्यपदक देऊन सन्मानित करण्यात आले. या सन्मानाचे मानकरी पुढील प्रमाणे - मुख्या. श्री. अ.वि. सहस्त्रबुद्धे, उपमुख्या. सौ. सविता केळकर, पर्य. सौ. ज्योत्स्ना चौबळ, श्री. प्र. बा. कुलकर्णी.

चिल्ड्रेन्स थिएटर , रंगमंच तर्फे घेण्यात आलेल्या समूहगीत गायन स्पर्धेत आपल्या शाळेला प्रथम क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त झाले. त्याचप्रमाणे याच संस्थेतर्फे घेण्यात आलेल्या समूहनृत्यात शेतकरी नृत्यास द्वितीय व बंजारा नृत्यास तृतीय पारितोषिक प्राप्त. मार्गदर्शक - सौ. उज्वला धोत्रे, कु. साधना कारंडे.

**विद्या प्रसारक मंडळाची व्यवस्थापन अध्यापन संस्था:**

संस्थेच्या अभ्यासक्रमांचा उद्घाटन सोहळा दि. १ सप्टेंबर रोजी थोरले बाजीराव सभागृहात संपन्न झाला. या प्रसंगी अर्धवेळ अभ्यासक्रम वर्ग तसेच नवीन द्विवार्षिक व त्रैवार्षिक अभ्यासक्रम वर्ग सुरु झाल्याचे जाहीर करण्यात आले. या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. बा.ना. बेडेकर तसेच मंडळाचे इतर पदाधिकारी तसेच सायन्स व लॉ कॉलेजचे प्राचार्य श्री. पाटील व श्री. इंजिनियर हेही उपस्थित होते. या वेळी व्यवस्थापक श्री. लाड यांनी आपल्या स्वागतपर भाषणात नवीन अभ्यासक्रमाबद्दल माहिती दिली. दिपप्रज्वलन व सरस्वती पूजना नंतर मान्यवरांनी आपापल्या भाषणामधून व्यवस्थापन विषयक मार्गदर्शन स्वरुप चार शब्द विद्यार्थ्यांना सांगितले व शुभेच्छा दिल्या. प्रा. कांबळी यांच्या आभार प्रदर्शना बरोबर कार्यक्रमाची सांगता झाली.

**बी.एन. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय :**

कॉलेजमधील गुणी कलाकारांना व्यासपीठ उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने कला मंडळाने एक गाण्याचा कार्यक्रम 'थोरले बाजीराव पेशवे सभागृहात' आयोजित केला होता. या कार्यक्रमांत कॉलेजच्या काही गुणी कलाकारांनी आपली अदाकारी पेश केली. कॉलेजचा जनरल सेक्रेटरी विजय माने याने उपस्थितांचे स्वागत करुन कार्यक्रमाला सुरुवात केली. सुगम संगीताच्या या कार्यक्रमात मानसी गलगले, कौस्तुभ राणे, पी. सौम्या, पूनम मोरे, यतिन ओक यांनी आपल्या सुरेल आवाजात भजन, चित्रपट गीत, भावगीत असे संगीतातील वेगवेगळे प्रकार गाऊन वातावरण अगदी ताजे तवाने करून टाकले. मधुरी सरदेसाई हिने सादर केलेल्या 'ती फुलराणी' तील प्रवेशाला रसिकांनी मनापासून दाद दिली. क्लिफर्ड व प्रसन्ना या जोडीने आपल्या मिमिक्रीने प्रेक्षकांना भरपूर हसवले. प्राजक्ता केळकरने पण आपल्या अंगचे अभिनय गुण सादर करताना कोणतीच कसर सोडली नाही. त्या नंतर विजय माने याने सादर केलेले आगरी भाषेतील 'आपली इज्जत हाय' हे एकपात्री प्रेक्षकांच्या मनात भरले. जयेश म्हात्रे आणि मंदार कोळी यांनी सादर केलेल्या कोळी गीतांनी संबंध कार्यक्रमात रंगत भरली.

वाद्यवृंदातील प्रशांत पाध्ये, अतुल बर्वे, श्री. परांजपे व रजनीकांत आडकर यांनी तबला, हार्मोनियम व सिंथेसायझरवर केलेल्या साथीसाठी त्यांचे विशेष आभार मानण्यात आले.

विद्यार्थ्यांच्या या उत्साहाला प्रोत्साहन देण्यासाठी प्राचार्य सी.जी. पाटील, उप प्राचार्य डॉ. श्री. सारंगसर, उप प्राचार्य दिक्षीत सर जातीने हजर होते आणि कार्यक्रम उत्तम झाल्याचे सांगून कला मंडळाचे प्रमुख डॉ. श्री. आठल्ये सर यांचे अभिनंदन केले.

---

निसर्गाची कधी चूक होत नाही. अपवाद फक्त माणूस !

बी.एन. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या 'स्टुडंट्स कौन्सील' ची पहिली बैठक नुकतीच महाविद्यालयाचे प्राचार्य श्री.सी.जी. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या बैठकीस उपप्राचार्य डॉ. श्री. सारंग सर, उप प्राचार्य श्री. दिक्षीत सर यांच्यासह महाविद्यालयातील इतर शिक्षकवर्ग देखील उपस्थित होता. या बैठकीस प्राचार्यांनी नियुक्त केलेल्या सर्व विद्यार्थी प्रतिनिधींनी कॉलेजचा T.Y BSC (प्राणिशास्त्र) चा विद्यार्थी विजय माने याची कॉलेजच्या जनरल सेक्रेटरी पदी एकमताने निवड केली. विजय माने याची काही दिवसांपूर्वीच कॉलेजचा कल्चरल सेक्रेटरी म्हणून देखील निवड केली गेली होती.

महाविद्यालयाच्या कलामंडळाच्या झालेल्या बैठकीत T.Y. BSC (प्राणिशास्त्र) चा विद्यार्थी यतिन ओक याची सह. कल्चरल सेक्रेटरी म्हणून निवड करण्यात आली.

बांदोडकर महाविद्यालयाच्या 'संयुजा' ह्या वार्षिक मासिकाचे सचीव पदासाठी कु. दिपाली विचारे तर उपसचीव म्हणून अमेय प्रधान यांची नियुक्ती करण्यात आली. ही नियुक्ति प्राचार्य प्रा. सी.जी. पाटील यांनी घेतलेल्या मुलाखतींच्या आधारे करण्यात आली. दिपाली विचारे हिला लेखनाचा अनुभव असून अमेयला रोट्रॅक्ट क्लबचा 'विभागीय संपादक' चा अनुभव आहे.

वर नमूद केल्याप्रमाणे बी.एन. बांदोडकर महाविद्यालयात '४ सप्टेंबर' रोजी 'शिक्षक दिन' साजरा करण्यात आला. या गोष्टींचे श्रेय कॉलेजच्या जनरल सेक्रेटरी विजय माने याला जाते. या त्याच्या अभिनव कल्पनेला इतर विद्यार्थ्यांकडूनही चांगला प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमाचं संयोजन अतिशय सुंदर व पद्धतशीर केल गेल. विजय माने याच्या प्रास्ताविकानंतर महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांना गुलाबपुष्प व शुभेच्छा पत्र देण्यात आली. सत्कारानंतर प्राचार्य सी.जी. पाटील यांनी अगदी मोजक्या शब्दात आपल्या भावना व्यक्त केल्या. त्या नंतर प्राध्यापकांसाठी विविध स्पर्धा आयोजित केल्या होत्या. प्रश्न मंजुषा, अंताक्षरी, 'एक मिनिट' सारख्या स्पर्धांना प्राध्यापक वर्गाकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. स्वतः प्राचार्य व उप प्राचार्य देखील स्पर्धेत सहभागी झाले होते. थोरले बाजीराव पेशवे सभागृह उत्साहाने फुलून गेले होते, कारण, एरवी प्रेक्षकांत बसून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणाऱ्या प्राध्यापकांना आज विद्यार्थ्यांकडून प्रोत्साहन मिळत होते. रोज विद्यार्थ्यांना प्रश्न विचारणाऱ्या प्राध्यापकांना आज 'प्रश्न मंजुषा' मालिकेत स्वतःच विचारात पडावं लागल. 'अंताक्षरी' मधे आवाज लावताना त्यांना आपल्या विद्यार्थीदशेतील दिवस आठवले असतील.



बी. एन. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय - ४ सप्टेंबर 'शिक्षक दिन' एक मिनिट खेळ. प्रा. स.ग. मेढेकर, प्रा. नामदेव मांडगे.

'एक मिनिट' खेळांमधे ही धमाल उडवून अंतिम फेरीत जास्तीत जास्त बिस्किट खाण्याची स्पर्धा प्रा. आठल्ये यांनी जिंकली. प्रा. माळी यांच्या अस्सल गावरान शैलीत गायिलेल्या गीतावर विद्यार्थी प्रेक्षक एकदम खूश होते.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनामधे कल्चरल कमिटी, मॅगझिन कमिटी, स्टुडंटस् कौन्सिल यांचा मोठा वाटा होता. यतीन ओक, क्लिफर्ड, प्रसन्ना, क्षमा, मंदार, पूनम, पवन, शिल्पा, विनीत, जयेश, सोनिया, सायली, अमेय, दिपाली यांनी या कार्यक्रमासाठी खूपच काम केले.

विद्या प्रसारक मंडळातर्फे वांदोडकर महाविद्यालयात सुरु होणाऱ्या ग्रंथालय व माहिती शास्त्र या विषयावर पदवी वर्गाचे उद्‌घाटन वांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या ग्रंथालयात दि. १९ सप्टेंबर रोजी संपन्न झाला. या वर्गास यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापिठाची मान्यता मिळालेली असून यंदाच्या शैक्षणिक वर्षासाठी ४० विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. मुंबई विद्यापीठाचे निवृत्त ग्रंथपाल व यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे अभ्यासक्रम संयोजक डॉ. शरद गणपुले यांच्या हस्ते उद्‌घाटन झाले. या प्रसंगी ते म्हणाले, ' ग्रंथालय शाखाचा अभ्यास करणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. माहिती व संगणक युगात ग्रंथालयांना दुसरा पर्याय नाही. या वेळी यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे मुंबई विभागीय संचालक श्री. चंद्रकांत भोंजाळ उपस्थित होते. विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. वा.ना. बेडेकर समारंभाच्या अध्यक्ष स्थानी होते. त्यांनी या अभ्यासक्रमास शुभेच्छा देऊन मध्यवर्ती ग्रंथालयाचा विचार बोलून दाखवला. सूत्रसंचलन व आभार प्रदर्शन प्रा. मोहन पाठक यांनी केले. कार्यक्रमास विद्या प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष, कार्याध्यक्ष व इतर मान्यवर व्यक्ति, विद्यार्थी व पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**जोशी-बेडेकर कला आणि वाणिज्य महाविद्यालय:**

महाविद्यालयातील विद्यार्थी व प्राध्यापकांनी मिळून राष्ट्रिय सेवा योजने अंतगर्त रू. २५०००/- निधी कारगिलच्या युद्धात जिवाची बाजी मारणाऱ्या जवानांसाठी गोळा केला. राष्ट्रीय सेवा योजनेच्या ८० विद्यार्थ्यांनी गणेश विसर्जनासाठी ठाणे पोलिसांना गर्दी नियंत्रण करण्यासाठी मासुंदा तलावावर मदत केली.

स्टाफ ॲकॅडमी तर्फे प्रा. डॉ. शुकंतला सिंग यांनी आयोजित केलेल्या कार्यक्रमा अंतर्गत निवृत्त कमांडर एम.एस्. सेठी यांना चर्चेसाठी आमंत्रित केले होते. त्यांनी कारगिल विषयावर आपले विचार मांडले.



निवृत्त कमांडर एम.एस्. सेठी यांचे स्वागत करताना प्राचार्य स.वा. गोखले दिसत आहेत.

आपले जवान कोणत्या खडतर परिस्थितीशी झुंज देत होते, याचे मनोवेधक चित्र त्यांनी भाषणातून आणि चित्रांतून दाखवले. या प्रसंगी व्ही.जे. केळकर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम.आर. कुरुप, प्राचार्य स.वा. गोखले, विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. वा. ना. बेडेकर, उपाध्यक्ष श्री. कांदीकर, कार्याध्यक्ष श्री. टिळु, कार्यवाह श्री. अुत्तम जोशी, उप प्राचार्य श्री. वडगलजर, उप प्राचार्य शोभा दोशी इ. मान्यवर उपस्थित होते. याच कार्यक्रमाचे वेळी 'महाराष्ट्र टाईम्स' चे संपादक कुमार केतकर यांनाही आमंत्रित केले होते. अत्यंत परखड शब्दात सद्य परिस्थिती वर त्यांनी भाष्य केले.



'महाराष्ट्र टाईम्स' चे संपादक 'कुमार केतकर' मार्गदर्शन करताना दिसत आहेत.

अकार्यक्षमतेला निसर्गाकडे क्षमा नाही.

मुंबई विद्यापीठाने नवीनच सुरू केलेल्या व्यवस्थापन पदवी अभ्यासक्रमाचे उद्घाटन प्राचार्य स.वा. गोखले यांच्या हस्ते झाले. या अभ्यासक्रमात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांपैकी बारावीत सर्वात जास्त गुण मिळवणाऱ्या तीन विद्यार्थ्यांना प्राचार्यांच्या हस्ते गुलाब पुष्प देण्यात आली.

कनिष्ठ महाविद्यालातील मुली व मुलांचे संघ तालुका व जिल्हा खो - खो स्पर्धांचे विजेते ठरले. यामुळे त्यांना नाशिक येथे होणाऱ्या विभागीय स्पर्धेत थेट प्रवेश मिळाला आहे. याच कॉलेजातील मुलींचा कब्बडी संघ जिल्हा स्पर्धेत उपविजेता ठरला आहे.

'प्रचीती' दादर तर्फे झालेल्या एकपात्री अभिनय स्पर्धेत कु. साक्षी बर्वे हिला पारितोषिक मिळाले. 'लोकशक्ती' तर्फे झालेल्या निबंध लेखन स्पर्धेत कु. सोनल कुलकर्णी हीस द्वितीय पारितोषिक मिळाले.

विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन 'शिक्षक दिन' साजरा केला. सर्व प्राध्यापकांना या प्रसंगी गुलाब पुष्प देण्यात आले. या वेळी अनेक निरनिराळे खेळ आयोजित करण्यात आले होते.

रोटरी क्लब अंबरनाथ यांनी घेतलेल्या 'सूरांजली' या स्पर्धेत जोशी - बेडेकर महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी पुरुष एकेरीत प्रथम क्रमांक तर द्वंदगीतात दोन्ही क्रमांकाची पारितोषिके पटकावली. चिराग पांचाळ पुरुष एकेरी स्पर्धेत प्रथम आला तर कु. राजश्री धाडणेकर, कु. वनिता पांचाळ व कु. मयुरा केतकर यांनी द्वंदगीतात द्वितीय क्रमांक पटकावला. सहभागी झालेल्या सर्व महाविद्यालयांपेक्षा जास्त पारितोषिके पटकावल्यामुळे जोशी - बेडेकर महाविद्यालयाला सांघिक गुणवत्तेचेही पारितोषिक मिळाले. परीक्षक म्हणून सौ. अनघा जोशी, सौ. सुलभा जोशी, श्री. दिपक पातकर यांनी काम पाहिले. या स्पर्धेत भाग घेण्यासाठी प्राचार्य स.वा. गोखले, प्रा. दिगंबर भिडे यांनी अनमोल सहाय्य केले. प्रा. अरुण जोशी यांनी या विद्यार्थ्यांची गाणी बसविण्यासाठी अपार परिश्रम घेतले.

प्रथम सत्र संपत आले असून, परिक्षांचे घोंगावणारे वारे परिसरात सर्वत्र पसरू लागलेत. नवरात्रातल्या गरबा रास, दांडिया रास यांच्या तालावर डोलणारी, नाचणारी तरुण मने, परिक्षेनंतर पुन्हा नवीन उपक्रम घेऊन उभे ठाकतील. अशी आशा करू, सर्व विद्यार्थ्यांना परिक्षेमधे सुयश चिंतून या सत्रा पुरता समारोप करते.

महाविद्यालयाच्या शिक्षक कक्षात प्राचार्य स.वा. गोखले यांच्या हस्ते प्रा. प्रकाश शिंदे यांनी लिहिलेल्या ' Environmental Studies' या पुस्तकाच्या तिसऱ्या आवृत्तीचे तसेच ' Work Book on Environmental Studies' या पुस्तिकेच्या १६व्या आवृत्तीचे प्रकाशन करण्यात आले. वाणिज्य शाखेचे विद्यार्थी या पुस्तकांचा मोठ्या प्रमाणात वापर करीत आहेत. त्याचप्रमाणे डोंबिवलीत भरविण्यात आलेल्या 'वसुंधरा' परिषदेत प्रा. प्रकाश शिंदे यांनी डोंबिवलीतील 'पर्यावरण व आजार' या विषयांवर इंडियन मेडिकल्स कौन्सिलच्या सभासदांसमोर व्याख्याने दिली.

२५ ऑगस्ट रोजी प्रा. प्रकाश शिंदे यांची यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाने अभ्यास मंडळावर निवड केली. त्यांना 'पायाभूत अभ्यास' (Foundation Course) या विषयावर भौगोलिक माहिती देणाऱ्या आकृत्यांचे संकलन व 'पर्यावरण शास्त्र' या विषयावर शंभर गुणांच्या अभ्यासाठी एक पुस्तक लिहिण्याची विनंती केली. पुढील वर्षी हे पुस्तक वाचावयास तयार होईल अशी अपेक्षा आहे.

प्रा. दामोदर मोरे यांनीही अनेक ठिकाणी व्याख्याने दिली. मुंबई आकाशवाणी विभागातर्फे मतदानाच्या संदर्भात झालेल्या चर्चासत्रात 'नवभारत टाईम्स' चे संपादक श्री. विश्वनाथ सचदेव यांच्यासह प्रा. दामोदर मोरे सहभागी झाले होते. मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे येथे आयोजित केलेल्या 'चंदनवन या कंटकवन' या अंगदसिंह बिसेन यांच्या काव्यसंग्रहाच्या प्रकाशन समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून

प्रा. दामोदर मोरे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. ए.पी. सिंग होते.

जोशी - बेडेकर वरिष्ठ महाविद्यालयाची सहल मुरबाड येथील 'विसावा रिसॉर्ट' या निसर्गरम्य ठिकाणी नेण्यात आली. केवळ पुस्तकी शिक्षण न घेता निसर्गापासून शिकण्यासारख्या अनेक गोष्टी असतात. म्हणूनच सर्व विद्यार्थ्यांना या निसर्गरम्य परिसरात नेण्यात आले. उत्स्फुर्त प्रतिसाद लाभलेल्या या सहलीचे संयोजन प्रा. लुकतुके आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी केले.

**डॉ. बेडेकर विद्या मंदिर (मा.वि.)**

कारगिलच्या लढाईत विजयी झाल्याबद्दल मा. पंतप्रधान श्री. अटलबिहारी वाजपेयी यांचे अभिनंदन करणारे पत्र इ.९अ च्या विद्यार्थ्यांनी लिहिले होते. त्या सोबत आपल्या कलाशिक्षिका सौ. मंजिरी दांडेकर यांनी काढलेले अटलजींचे व्यक्तिचित्रही पाठवण्यात आले. या सर्वांस उत्तर म्हणून त्यांनी विद्यार्थी व शाळेस शुभेच्छा दिल्या आहेत. (सोबत पत्र आहे.)

शाळेतील इ. ५वी ते १०वी च्या विद्यार्थ्यांनी अथर्वशीर्षाची आवर्तने केली.

हिंदू जागृती गणेशोत्सव मंडळाने ठाण्यातील अष्टविनायक सायकल मॅरेथॉन स्पर्धा आयोजित केली होती. त्यात विनित मोरे (१०ब) यास १८ वर्षाखालील मुलांच्या गटात चौथा क्रमांकाचे पारितोषिक व प्रमाणपत्र प्राप्त झाले तसेच कु. चेतन गायधनी (९ब) यास १४ वर्षाखालील मुलांच्या गटात द्वितीय पारितोषिक रु. २५१/- व प्रमाणपत्र प्राप्त झाले.

मे १९९९ मधे घेण्यात आलेल्या राष्ट्रीय प्रज्ञा शोध परीक्षेत कु. जयेश शशिकांत सावंत यास शिष्यवृत्ती प्राप्त झाली.

•••

---

Additional Private Secretary
to the Prime Minister

प्रधान मंत्री भवन नई दिल्ली
PRIME MINISTER HOUSE
NEW DELHI

19 जुलाई, 1999

प्रिय सुश्री मंजिरी,

प्रधान मंत्री जी को संबोधित आपका 12 जुलाई, 1999 का पत्र मिला जिसके साथ आपने उनका एक चित्र भी भेजा है । प्रधा मंत्री जी आपको व आपके विद्यामंदिर को सभी छात्रों को अपनी शुभकामनाएं प्रेषित करते हैं ।

सादर,

आपका
सही/-
वीण आनन्दराजन

सुश्री दांडेकर मंजिरी
मधु मिलिंद बंगला, घंटाळी रोड, नौपाडा, ठाणे ४०० ६०२.

---

निसर्ग समजून त्याप्रमाणे वागायला शिका.